# भगवान ऋषभदेव

## 1

## कालचक्र

काळाला चक्राची - चाकाची -उपमा दिले जाते. चक्र किंवा चाक हे स्वत:भोवती सतत फिरत राहण्याचे प्रतीक होय. गाडीच्या चाकाप्रमाणे काळ देखील क्षणभरही विसावा न घेता फिरत असतो. या सत्याचा अनुभव आपणास दररोज आपला जीवनकाल व्यतीत करताना येतो . जग अतितीव्र वेगाने बदलत चालले आहे असे म्हटले जाते. वस्तुत: या संसरण म्हणजे बदलण्याच्या स्वरुपालाच संसार असे नाव दिले गेले आहे .हे बदलणे अथवा परिवर्तन अखंडपणे चालु राहण, ही नवीन घटना नव्हे जीवाच्या उत्कर्षाचे सर्वोच्च शिखर आणि अवनतीची खोल दरी यांचाही समावेश यातच होतो .

उन्नती आणि अवनती ह्या दोन्ही साक्षेप आहेत . उन्नतीच्या पाठोपाठ अवनती, आणि अवनतीच्या पाठोपाठ उन्नती नेहमी घावून येते. जे मूल उभे राहण्याचा प्रयत्न करते ते पडते देखील आणि जे मूल पडते ते उठून उभे देखील राहते . गाडीचे चाक फिरत असता त्याचा जो भाग वरच्या बाजूस असतो तो खाली तळाला देखील जातो आणि तळाशी असलेला भाग वर येतो . संसाराची अवस्था अशीच आहे . एकदा हे जग उन्नतीच्या मार्गावरुन ढळून अवनतीकडे जाते, आणि पुरश्च अवनतीच्या मार्गावरुन उन्नतीच्या मार्गाकडे धावत सुटते . ज्या काळात हे विश्व अवनतीकडून उन्नतीकडे धावू लागते त्यास उत्सार्पिणी काल असे म्हणतात , आणि ज्या काळात ते उन्नतीकडून अवनतीकडे वाटचाल करते त्यास अवसर्पिणी काल असे म्हणतात . उत्सार्पिणी काळात मानवाचे ज्ञान
आयुष्य, शक्ती वगैरे क्रमाने वाढत जातात आणि अवसर्पिणी काळात ते कमी कमी होत जातात. शुक्ल पक्षात चंद्रकोर क्रमाने वाढत जाते आणि कृष्ण पक्षात क्रमाने तिचा क्षय होत जातो त्याचप्रमाणे मानवाची अवस्था वरील दोन काळात होत असते. जसे शुक्लपक्षानंतर कृष्णपक्ष आणि कृष्णपक्षानंतर शुक्लपक्षाचे आगमन होतेच तसेच उत्सर्पिणी कालानंतर अवसर्पिणी काल आणि अवसर्पिणी कालानंतर उत्सार्पिणी काल येत असतो.

या दोनही काळाचे प्रत्येकी सहा-सहा भेद आहेतउत्सार्पिणी काळाचे - 1) दु:षमादु:षमा, 2) दुष:मा, 3) दु:षमासुषमा, 4) सुषमादु:षमा, 5) सुषमा आणि 6) सुषमासुषमा असे

सहा भेद पडतात. अवसर्पिणी काळाचे - 1) सुषमासुषमा, 2) सुषमा, 3) सुषमादु:षमा, 4) दु:षमासुषमा,, 5) दु:षमा आणि 6) दु:षमादु:षमा हे सहा भेद आहेत.

काळाच्या एका विभागास समा म्हणतात तसेच सु आणि दुर हे उपसर्ग चांगले आणि वाईट या अर्थी घेतले जातात. समा च्या प्रथम सु आणि दुर उपसर्ग जोडल्यास सुषमा आणि दु:षमा असे शब्द बनतात. यास्तव सुषमा शब्दाचा अर्थ चांगला काळ आणि दु:षमा शब्दाचा अर्थ वाईट काळ असा होतो. सुषमा आणि दु:षमा या शब्दांच्या अर्थानुसार अवसर्पिणी काळाचे पुढील प्रमाणे सहा प्रकार होतील 1) फार चांगला काळ, 2) चांगला काळ, 3) चांगला वाईट काळ, 4) वाईट चांगला काळ, 5) वाईट काळ, 6) फार वाईट काळ. हेच प्रकार उलटून ठेवल्यास उत्सर्पिणी काळाचे सहा भेद होतात. यातील पहिला काळ चार कोडाकोडी सागर वर्षाचा. दुसरा काळ तीन कोडाकोडी सागर वर्षाची तिसरा काळ दोन कोडाकोडी सागर वर्षाचा चौथा काळ एक कोडाकोडी सागरास बेचाळीस हजार वर्षे कमी. पांचवा दु:षमा काळ व सहावा दु:षमादु:षमा काळ हे प्रत्येकी एकवीस हजार वर्षाचे आहेत. याप्रमाणे दहा कोडाकोडी सागरांचा एक अवसर्पिणी काळ व दहा कोडाकोडी सागरांचा दुसरा उत्सार्पिणी काल असतो. या दोहोंचा मिळून एक कल्पकाल होतो . कल्पकाल वीस कोडाकोडी सागर वर्षाचा असतो. कोटिसंख्येला कोटिसंख्येने गुणून येणा-या प्रमाणाला कोडाकोडी असे म्हणतात.

## भोगभूमि

एके काळी या भारत-भूमीति अवसर्पिणी कालाचा पहिला प्रकार चालु होता . त्यास सुषमासुषमा असे नांव दिले जाते. या युगात येथील मानवांचे शरीर वज्राप्रमाणे सुदृढ व अंगकांती तापविलेल्या सोन्यासारखी तांबूस वर्णाची असे . सारे पुरुष अतिशय बलवान धीर, वीर, सूर्याप्रमाणे तेजस्वी, चंद्राप्रमाणे शांत, सामर्थ्यवान अन् पुण्यशाली असत. त्याचे वक्ष:स्थल विशाल असून ते दीर्घायुषी असत .

त्यावेळी स्त्रिया देखील पुरुषाप्रमाणे शरीराने सुदृढ आणि दीर्घायुषी व आपल्या पतीशी एकनिष्ठ असत. आणि पुरुष आपल्याच पत्नीवर अनुरक्त होत . कल्पवृक्ष आणि कल्पलतेप्रमाणे स्त्री आणि पुरुषाचा जोडा शोभून दिसत असे. प्रत्येक जोडा जीवनपर्यत कोणत्याही दु:खाकष्टाशिवाय भोगांचा उपभोग घेत असे .

त्यांना कोणतेही कष्ट करावे लागत नसत. त्यावेळी कोणत्याही प्रकारच्या रोगाचा प्रादुर्भाव होत नसे . मानसिक चिंता करण्याचे कारण नव्हते अन् अकस्मात मृत्यू येण्याचेही भय नव्हते त्या वेळच्या मानवांच्या जीवनात विघ्नांना, संकटाना अडचणींना स्थान नव्हते. दहा

प्रकाराच्या कल्पवृक्षांकडून त्यांना जीवनाला आवश्यक वाटणाऱ्या वस्तु मिळत. त्यामुळे ते आपला जीवनकाल सुखाने घालवीत असत. जमीन किंवा तिच्या उत्पन्नावरा कोण्याएकाची मालकी नव्हती अधिकार हा शद्बच त्यांच्या भाषेत निर्माण झाला नव्हता. त्यांच्या गरजा थोडक्या होत्या आणि त्या गरजांची परिपूर्ती कल्पवृक्ष करीत होते. यामुळे ते सुखी अन् समाधानी होते. त्यांना दुसऱ्या दिवसाची- भविष्याची चिंता नव्हती. त्यासाठी कोणत्याही वस्तूचा संचय करुन ठेवण्याचा त्यांना लोभ होत नसे. अपराध कशास म्हणतात, याची देखील त्यांना जाणीव नव्हती.

त्या वेळी अधिकार गाजविणारा कोणी राजा नव्हता संरक्षणाची गरज असणारी दुबळी प्रजा नव्हती. कोणी शेतकरी नव्हता, आणि ना कोणी जमीनदार. पैशाचे नाव नसल्याने त्या काळी कोणी गरीब नसे व कोणी घनवान नसे. गिरण्यांची आवश्यकता नसल्याने कोणी गिरणी मालक नव्हता आणि ना कोणी मजुर . एवढेच नव्हे तर त्या वेळी कोणत्याही प्रकारचे शासन वा तंत्र नव्हते. खऱ्या अर्थाने सारे स्त्रीपुरुष स्वतंत्र होते आणि सर्वत्र नैसर्गिक समानता होती .

जीवनाच्या बाह्य व्यवहारातही कोणती विषमता नव्हती. साऱ्या पुरुषांना आपापल्या स्त्रिया होत्या, अन् सर्व स्त्रियांना पती मिळत. प्रत्येक स्त्रीपुरुषाचा जोडा आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यत अखंड राहात असे. आयुष्य संपल्यानंतर पुरुषाला जांभई व स्त्रीला शिंक येई . त्यामुळे दोघांना एकाच वेळी मरण येई. मूत्यूसमयी प्रत्येक जोडा एका मुलाला अन् मुलीला जन्म देऊन नष्ट होई. दोन्ही मुले आपापला अंगठा चोखून वाढत जात. आणि वाढ पूर्ण झाल्यानंतर आपल्या माता-पित्याचे स्थान ते स्वीकारीत. त्यामुळे लोकसंख्या वाढण्याचे त्या वेळी भय नव्हते. याप्रमाणे त्या वेळी स्त्रीपुरुषांचे जीवन भोगप्रधान होते. यास्तव यास भोग-भूमी-काल असे महटले जात होते.

पहिल्या सुषमासुषमा कालानंतर दुसरा सुषमा काल आला. या काळात पहिल्या कालाएवढी सबत्ता नव्हती. पण सर्व व्यवस्था आणि स्थिती मात्र प्रथम कालाप्रमाणे होती. यास्तव जिथ पहिल्या काळात उत्कृष्ट भोगभूमी होती, तिथे दुसऱ्या काळात मध्यम भोगभूमी बनली. यानंतर जेव्हा दुसरा काल संपला त्या वेळी मानवांच्या बुद्धिबलाच्या ऱ्हासाबरोबर कल्पवृक्षापासून मिळणाऱ्या वस्तुत निकृष्टता आली. तसेच मध्यम भोग-भूमीच्या स्थानास आंत जघन्य भोग-भूमीची अवस्था प्राप्त झाली.

कर्मभूमीकडे

क्रमाक्रमाने तिसरा काल संपण्यास पल्याच्या आठव्या भागाइतका काल शिल्लक राहिला होता त्यावेळी या भारत भूमीतील पूर्वीच्या प्रचलित व्यवस्थते एकदम शीघ्रतेने क्रांती होण्यास सुरवात झाली. भोगभूमीत कल्पवृक्षांच्या आश्रयाने सुखाने जीवन घालविणाऱ्या जनतेसमोर नित्य नवे प्रश्न, नव्या अडचणी निर्माण होऊ लागल्या. राजमहालात सोन्याच्या ताटात पंचपक्वान्नांचे भोजन करुन वाढलेल्या राजपुत्राचे राज्य हिरावून घेताच त्याची जशी दयनीय अवस्था होते तशी त्या काळी जनतेची अवस्था झाली .

अशा वेळी जनतेमधील महान पुरुष वेळोवेळी भयग्रस्त जनतेला आपल्या बुद्धिसामर्थ्याने दिलासा देण्यासाठी पुढे आले त्यांनी अंधारात चाचपडत असलेल्या जनतेला मार्ग दाखविला. त्या महापुरुषांना मनु अथवा कुलकर असे नाव दिले गेले.

भोग-भूमीकालात ज्योतिरंग कल्पवृक्षांच्या तीव्र प्रकाशाने जनतेस चंद्रसूर्याचे दर्शन होत नसे ; पण त्यांचा प्रकाश मंद होताच एके दिवशी आषाढी पौर्णिमेच्या संध्याकाळी पूर्व दिशेस उगवणारा चंद्र आणि पश्चिमेस मावळणारा लाल सूर्य पाहून जनता घाबरली. त्या वेळी प्रतिश्रुंति नावाचा महापुरुष विशेष बुद्धिमान समजला जाई. सर्व जनता एकत्र मिळून त्याच्याकडे गेली त्यांनी म्हटले- भद्र पुरुषानी ! हे चंद्र आणि सूर्य नावाचे ग्रह आहेत. आजपर्यत ज्योतिरंग कल्पवृक्षांच्या तीव्र प्रकाशात यांचा प्रकाश लपला होता. त्यामुळे हे ग्रह दिसू शकत नव्हते. आता काळ बदलल्याने त्यांचा प्रकाश मंद झाला आणि हे ग्रह स्पष्ट दिसू लागले. या ग्रहांना तुम्ही बिलकूल घाबरु नका.

प्रतिश्रुतीच्या या भाषणाने भयग्रस्त जनतेंच्या ह्दयाला दिलासा मिळाला. त्यांनी प्रतिश्रुतीची आदरपूर्वक स्तुती केली. आणि प्रतिश्रुतींना पहिले मनू असे संबोधण्यात येऊ लागले.

यानंतर क्रमाने पुष्कळसा काळ लोटल्यानंतर ज्योतिरंग कल्पवृक्षांचा प्रकाश अतिशय मंद पडू लागला. विझणाऱ्या दिव्याप्रमाणे त्यांचा प्रकाश नष्ट होण्याच्या बेतात होता. तोंच एके दिवशी सायंकाळी आकाशात तारांगण लुकलुकत चमकू लागला. तो पाहून मानव पुरश्च भयाने व्याकुळ झाले. त्यावेळी सन्मति नावाचा धीरपुरुष मानवात विशेष बुद्धिमान समजला जात. असे सारे मानव त्याच्याजवळ गेले सन्मतीने क्षणभर विचार करुन यांना तारा म्हणतात, असे त्यांना सांगितले. यापूर्वीही त्या अस्तित्वात होत्या. परंतु ज्योतिरंग कल्पवृक्षांच्या तीव्र प्रकाशात त्या लपून राहिल्या होत्या आता कल्पवृक्षांचा प्रकाश क्षीण झाल्याने त्या आपणास स्पष्ट दिसू लागल्या आहेत.

सन्मतीच्या या स्पष्टीकरणाने लोक निर्भय झाले. त्यांनी सन्मतीची प्रशंसा करुन सन्मान केला. हे सन्मति म्हणजेच दुसरे मनू होत.

या घटनेनंतर कांही काळ गेला. पूर्वी सिंह, वाघ , वगैरे पशू नम्र व शांत स्वभावी होते. ते मानवास त्रास देत नसत. जनता इतर पशूप्रमाणे त्यांचे देखील पालनपोषण करी. परंतु आता ते आपले क्रुर स्वरुप दाखवू लागले. मानवातच पूर्वीचे बलपौरुष आणि सुखी-समाधानीपणा राहिला नाही नवीन संकटांच्या निर्माणबरोबर ते भयग्रस्त व चिंतातुर होऊ लागले. तेव्हा पशू आपला जन्मजात क्रूर स्वभाव किती दिवस विसरतील ? सूर्य चंद्र अन् तारे दूर उंच आकाशात होते, पण पशू मानवांच्या सोबतीला रात्रंदिवस पृथ्वीवर होते. त्यांच्या भयंकर गर्जनेने भयभीत होऊसारी जनता त्या वेळच्या क्षेमंकर नावाच्या बुद्धिमान महान पुरुषाकडे गेली, व म्हणाली - हे देव! ज्या सिंहव्याघ्रादिक पशूंना आम्ही आमच्या अंगाखांद्यावर खेळतीत होतो ; खाऊ पिऊ घालून वाढवीत होतो, तेच पशू आज आम्हांस आपल्या विक्राळ दाढा, तीक्ष्ण नखे यांनी फाडून खाण्याचा प्रयत्न करीत आहेत. यांच्यापासुन संरक्षण करुन घेण्याचा आम्हास मार्ग दाखवा.

क्षेमंकरांनी म्हटले- हा काळाचा प्रताप आहे. जोपर्यत आपणाला त्यांची भीती वाटत नव्हती, तोपर्यत हे देखील निर्भय होते. आता मानवात पूर्वाचे सामर्थ्य व निर्भयता राहिली नाही. यासाठी पशूंनी देखील आपले रौद्र रुप धारण केले आहे. आपण या लांब व तीक्ष्ण नखे आणि विक्राळ दाढा असलेल्या पशूंची संगत सोडून द्या, आणि यांच्यापासून सावध रहा !

क्षमंकरांचा उपदेश ऐकून आजवर मिळून मिसळून राहीलेल्या मानवांनी पशुंपासून दूर राहण्यास सुरवात केली. अशा प्रकारे मानव व पशू यांच्या दरम्यान भेदाची-पहिली भेदभावाची रेषा ओढली गेली .

यानंतर जसजसा अधिक काल व्यक्तीत होत चालला तस तसे हिंस्त्र पशू व मानवामध्ये अधिकाधिक अंतर पडत चालले. कारण मनुष्य हा भयाने वाध, सिंहादि क्रूर पशूंपासून जसजसा दूर होत चालला, तसतसे ते पशू अधिक प्रबळ आणि भयानक बनत गेले. त्याच्या भयानक क्रूर सामर्थ्याला पाहून भीतीने मानव. अधिकाधिक गारठून गेला. मानवानी जरी पशूंचा सहवास सोडला होता तरी देखील त्या दोघांचे रहाणे एकत्रच होते. अशा अवस्थेत वाध, सिंहादि पशू संधी साधून मानवांवर आक्रमण करु लागले. तेव्हा मानवांसमोर पुरश्च एक नवेच संकट उभे राहिले. सारे मानव भयाने त्या वेळी विशेष

बुद्धिमान गणल्या गेलेल्या क्षेमंकर नावाच्या चौथ्या मनूला शरण गेले. त्यांनी मनुष्यास लाठी वगैरे साधनांनी स्वत:चे रक्षण करुन घेण्याचा मार्ग दाखविला.

पुरश्च अनेक वर्षे लोटली . कल्पवृक्ष दिवसेंदिवस विरळ होत गेले. कल्पवृक्षांपासून आवश्यक त्या वस्तूदेखील विरळ मिळू लागल्या. मानवजातीच्या अध:पाताची स्पष्ट लक्षण दिसू लागली लोकात परस्पर वादविवाद होऊ लागले. ते कल्पवृक्षांवर आपआपला अधिकार सांगू लागले त्या वेळी विचारवंत सीमंधर नावाच्या मनूने प्रत्येकाच्या कल्पवृक्षांची सीमा तोंडी निश्चित करुन दिली.

काही काळ लोटल्यानंतर कालौघात कल्पवृक्ष फारच थोडे राहिले व त्यांच्यापासून साधनसामग्री सुद्धा थोडी थोडी मिळू लागली तेव्हां मानवातील परस्पर वादविवादाने उग्र रुप धारण केले. मानव एक दुसऱ्यावर हात टाकण्यास तयार झाले. तेव्हा सीमंधर नावाच्या मनूने तोंडी निश्चित केलेल्या सीमेस झाडीझुडपांचे कुंपण घातले आणि वादविवाद व झगडा थांबविला .

तदनंतर कांही काळ लोटला. त्यावेळी मानव हौसेने पशूंचे लालन-पालन करीत. पण त्यांच्याकडून काम करवून घेण्याची त्यांना कधीच आवश्यकता वाटली नाही यामुळे या पशूंकडून काम करवून घेतले जाते याची त्यांना कल्पना नव्हती. त्या वेळी विमलवाहन नावाच्या सातव्या मनूने पशूंच्या पाठीवर जीन वगैरे घालून त्यांच्यावर आरुढ कसे व्हावयाचे व त्यांच्यावर खोगीर, अंबारी वगैरे कशी चढवायची हे शिकविले.

यानंतर बराचसा काळ लोटल्यावर चक्षष्मान नावाचे आठवे मनू झाले. त्यांच्या पूर्वीच्या काळात स्त्री-पुरुष आपल्या मुलांना जन्म मूत्युमुखी पडत. त्यावेळी स्वत:च्या मुलांचे मखाचे दर्शन त्यांना होत नसे. पण आता मुलांना जन्म दिल्यानंतर ते काही काळ जिवंत राहू लागले. तेव्हा ते आपल्या मुलांना पाहून भयभीत झाले. चक्षुष्मानने सर्व गोष्टीचा खुलासा करुन त्यांच्या मनातील भीती घालविली.

त्यांच्यानंतर यशस्वान नावाचे नववे मनू झाले. त्यांनी जनतेला आपल्या मुलांना आशीर्वाद देण्याचे शिकविले तदनंतर क्रमाने अभिचंद्र नावाचे दहावे आणि चंद्राभ नावाचे अकरावे मनू झाले. त्यांनी जन्मलेल्या बालकाचे लालन-पालन कसे करावे हे शिकविले.

ज्योपर्यंत कल्पवृक्षांचे तीव्र प्रकाशकिरण सूर्याच्या किरणांना पृथ्वीवर येण्यापूर्वी मिळ्त, तोपर्यंत पाऊस देखील पडत नसे. परंतु जेव्हा कल्पवृक्षांचा लोप होऊ लागला आणि त्यांच्यात सूर्याच्या तीव्र किरणांना अडविण्याचे सामर्थ्य राहिले नाही, तेव्हा आकाशात हळूहळू

मेघ दिसू लागले. थोडीथोडी वर्षा होऊ लागली. हळूहळू पावसाचा जोर वाढत गेला आणि नदीनाल्यांची नवीन सुष्टी निर्माण झाली. तेव्हा नदीपलीकडे कसे जायचे हे जनतेला समजेना. त्यावेळी त्यांना मरुद्देव नावाच्या मनूने नाव तयार करुन त्याद्वारा नदी तरुन जायचे शिकविले.

प्रसेनजित नावाच्या तराव्या मनूच्या वेळी एक नवीन प्रश्न निर्माण झाला. त्या कालापूर्वी मूल जन्मतांना त्यांच्याबरोबर मांसाची पातळशी पिशवी ( जार ) येत असे. हळूहळू जन्मणाऱ्या मुलांच्या शरीरावर मांसाचा एक पातळ पडदा राहू लागला. प्रसेनजितने हा पडदा फाडून काढून टाकण्याचे शिकविले.

प्रसेनजितनंतर नाभिराज नावाचे चौदावे मनू झाले. त्या काळी जन्म घेणाऱ्या बालकांच्या नाभीमध्ये-बेबीमध्ये-जोडलेली एक नाळ रहात असे. त्यांनी ती नाळ कशी कापावी हे शिकविले त्यामुळे ते नाभिराज या नावाने प्रसिद्ध झाले

नाभिराजांच्या वेळेस पावसाने ऋतुंचे रुप धारण केले होते. आकाशात काळे अन् सधन नील मेघ येत असत. ते साऱ्या निळ्या आकाशात धावू लागत. सारे आकाश मेघमय होत असे. मेघांनी घनगंभीर गर्जना करण्यास सुरुवात केली. तर उंच पहाडांमधून त्या गर्जनेचा प्रतिध्वनि उमटू लागे मेध्घगर्जना कानी पडताच मोर मस्त होऊन नाचू लगत् पावसाच्या फवाऱ्यातील जलकणांनी शीतल व ओला झालेला वायू मोरांच्या फुललेल्या पंखाशी खेळू लागला. गर्जणाऱ्या मेघांतून जलधारांचा होणारा वर्षाव पाहून असे भासत होते की, कल्पवृक्षांचा क्षय झाल्याने दु:खाने आकाश मोठामोठयाने आक्रोश करुन रडत आहे की काय ?
पुन्हा पुन्हा पावसाचा वर्षाव झाल्याने पृथ्वीवर अनेक प्रकारचे अंकुर उगवून हळू हळू वाढू लागले . त्यांनी कल्पवृक्षा प्रमाणे आपले मोठे स्वरुप धारण केले् सर्व सृष्टि निरनिराळ्या प्रकारच्या खाद्य आणि अखाद्य वनस्पतीनी समृद्ध झाली . परंतु लोकांना त्यांचा उपयोग कसा करुन घ्यावा हेच समजत नव्हते. ते पून्हा पून्हा त्या हिरव्यागार सृष्डीकडे आशाळभूत नजरेने पाहू लागले व गोंधळून व बावरुन गेले. जेव्हा लोक भुकेने व्याकुळ झाले तेव्हा सारे मिळून ते नाभिराजांकडे गेले. त्यांनी दीनवाणीने म्हटले, हे प्रभो ! आम्हांस जीवनदान देणारे कल्पवृक्ष आम्हांस अनाथ बनवून नष्ट झाले. त्यांच्याविना आम्ही आता कसे जिवंत रहावे ?
कल्पवृक्षांऐवजी पृथ्वीवर आता निनिराळ्या प्रकारचे वृक्ष उगवले आहेत . त्याला सुंदर पिवळीधमक फळे आली आहेत. ते वायूने, पाचून, डोलून आम्हाला जवळ बोलवितात आम्ही त्या सुंदर वृक्षांकडे जायचे का ? त्यांची फळे खाणे योग्य होईल का ? त्यामुळे आमच्या शरीरास अपाय होणार नाही ना ? हे देव ! आपण ज्ञानी व जाणते आहात आम्ही अज्ञ असल्याने दु:खी होऊन

मार्गदर्शनासाठी आपल्या चरणांकडे धाव घेतली आहे. कृपया आम्हाला जीवन सुंदर रीतीने जण्याचा मार्ग दाखवा.

भद्र पुरुषानो ! हे वृक्ष तुमच्या जीवनास उपयोगी आहेत यात शंका नाही. परंतु आपण त्यातील विषवृक्षांना हात देखील लावू नका. पलीकडे, त्या तिथे औषधी वनस्पती आहेत. जे काठीप्रमाणे उंच सरळ आहेत, त्यांना ऊस म्हणावयाचे. त्यात गोड रस भरला आहे. दातांनी वरील साल सोलून त्याच्या आतील रस चोखायचा. नाभिराजांनी दयार्द्र अंतकरणाने हातांच्या बोटांनी खुणा करुन लोकांना माहिती सांगितली. त्याचप्रमाणे त्यांनी हत्तीच्या गण्डस्थळावर चिखलाचा लेप देऊन ताट वगैरे भांडी बनविण्याचे ज्ञान जनतेस दिले.

त्यांनी दिलेल्या जीवनोपयोगी ज्ञानाने लोक संतुष्ट झाले अन् त्यांनी नाभिराजांचा मोठा आदरसत्कार केला.

प्रथम भोगभूमिकालात मानव संतोषी होते, कल्पवृक्षद्वारा त्यांना जीवनावश्यक वस्तू प्राप्त होत असत. त्यामुळे अपराध करण्याकडे त्यांची मुळीच प्रवृत्ती नव्हती. परंतु आता जीवनावश्यक वस्तुंची कमतरता पडल्यानंतर मानवात अपराध करण्याची प्रवृत्ती बळावली. जीवनावश्यक वस्तुंच्या वाढत्या गरजेबरोबर त्यांची परिपूर्ती करण्यासाठी जनतेत अपराध करण्याची प्रवृत्ती वाढत गेली. त्या प्रवृत्तीस आळा धालण्यासाठी शासन करणे आवश्यक झाले .

पहिले पांच मनू आपल्या काळात अपराध्याना केवळ हा या शद्वाने दण्ड देत, हा या शब्दाचा आशय असा आहे. अरेरे ! नीच कार्य केलेस ! तदनंतर सहा ते दहापर्यतच्या मनूनी अपराध्यांना हा मा या शद्वाद्वारा दण्ड दिला. हा मा या शब्दाचा अर्थ असा आहे - अरेरे नीच कार्य केलेस, यापुढे असे कार्य करु नकोस ! शेवटच्या चार मनूंच्या काळी हा मा धिक या तीन शब्दाद्वारा कठोरातील कठोर शिक्षा सांगितली जात होती. त्याचा अर्थ असा- अरेरे ! नीच कार्य केलेस, यापुढे असे कार्य करु नकोस. तुझा धि:क्कार असो ,याप्रमाणे जसजसा मानवांचा नैतिक अध:पात होऊ लागला त्याप्रमाणे दण्ड देण्याचे प्रमाण देखील वाढू लागले .

अशा क्रमाने कालचक्राने फिरत भोगभूमीकडून कर्मभूमीकडे आपले पहिले पाऊल टाकले आणि भोग घेण्यात रममाण झालेल्या सुखी आणि शांत जीवनात नवनवीन अडचणी - संकटे निर्माण करुन मानवाला कर्म करण्याची प्रेरणा केली. परंतु तोवर कर्म-भूमि-काल येण्यास थोडासा अवधि बाकी राहिला होता, आणि तो एका महान् युगपुरुषाची मार्गप्रतीक्षा करीत होता .

## ऋषभदेवाचे पूर्वभव

### म हा ब ल

जम्बू-द्वीपात मेरु पर्वताच्या पश्चिमेस विदेह क्षेत्र आहे. तेथून नेहमी मुनिजन कर्मरुपी बंधने तोडून देहरहित होऊन मुक्ति मिळवितात. म्हणून त्या क्षेत्राचे विदेह हे नाव सार्थ आहे. त्या विदेह क्षेत्रात गन्धिल नावाचा एक देश आहे. तो स्वर्गखण्डाप्रमाणे सुंदर असून त्याच्या मध्यभागी विजयार्ध नावाचा एक उत्तुंग व विस्तृत पर्वत आहे. त्यावर चारणऋद्धिधारी मुनी नेहमी सिंहाप्रमाणे निर्भय बनून विहार करीत असतात. I त्या पर्वताच्या उत्तर श्रेणी अलका नावाची एक विशाल नगरी आहे. अतिवल नावाचा एक विद्याधर त्या नगरीचा राजा होता. इतर सर्व विद्याधर राजे त्याची आज्ञा मुकुटाप्रमाणे आपल्या मस्तकावर धारण करीत होते. तो मोठा प्रतापी, धीरवीर आणि विजेता होता. तसेच तो निरंतर बुद्ध व अनुभवी पुरुषांबरोबर सहवास करीत असे. मोठमोठया शूर शत्रुवर जसा तो विजय मिळवी तसाच तो आपल्या इंद्रियावर देखील मिळवीत असे.

त्या राजास मनोहरा नावाची राणी होती तिने महाबल नावाच्या भाग्यशाली पुत्राला जन्म दिला. सद्गुरुच्या सहवासात आपल्या पूर्वभवातील उत्तम संस्काराने थोडयाच काळात सर्व विद्यामध्ये प्राविण्य झाला. अतिबल महाराजांनी आपल्या पुत्राचे सर्व विद्यामधील प्राविण्य आणि विनयादि सदुगुण पाहून त्यास युवराज बनविले. काही कालानंतर अतिबलाने विषयापासून विरक्त होऊन जिनदीक्षा घेण्याचा संकल्प केला. आपल्या महाबल नावाच्या पुत्राला त्याने राजयभिषेक केला आणि सर्व राज्यकारभार त्यावर सोपविला. स्वत: इंद्रियभोगापासून विरक्त होऊन साखळदंडापासून मुक्त झालेल्या हत्तीप्रमाणे त्याने घर सोडून वनाचा मार्ग धरला. अर्थात् त्याने जिनदीक्षा घेतली.

अतिबलाने दीक्षा ग्रहण केल्यानंतर महाबलाने राज्यरथ पुढे चालविला. राज्यश्री प्राप्त झाल्यानंतर देखील तो अधिकच नम्र व निर्मद राहिला. इतरांप्रमाणे राज्य मिळताच यौवन, रुप ऐश्वर्य आणि अधिकाराच्या मदाने तो बहकून गेला नाही, त्याने आपल्या राज्यात कोणांवरही अन्यास होऊ दिला नाही. प्रजेला स्वप्नात देखील कोणाच्या भयाची कल्पना येईना .

त्याचे चार मंत्री होते, त सारे बुद्धिमान आणि दूरदृष्टी होते. त्यांची नावे क्रमश: महामति, संभिन्नमति, शतमति आणि स्वयंबुद्ध अशी होती. हे चार मंत्री त्या राज्याचे मूळ आधार होते. त्यात स्वयंबुद्ध मंत्री सम्यग्दृष्टी होता. इतर तिघे मंत्री मिथ्यादृष्टी होते.

जरी त्यांच्यात अशा प्रकारे मतभेद होते तरी ते सारे आपल्या राजाचे हित करण्यात नेहमी तत्पर असत.

एकदा स्वयंबुद्ध मंत्री मेरु पर्वतावरील अकृत्रिम जिनमंदिराची वन्दना करण्याकरीता गेला . तेथील भोगतालचे सुष्टिसौंदर्य पाहून त्यास अत्यंत हर्ष झाला. मेरु पर्वताच्या तळभागी चारी बाजूला भद्रशाल वन आहे. आणि पर्वतावर नन्दनवन, सौमनसवन व पाण्डूक अशी चार वने आहेत. ही चारही वने बारा महिने वृक्षांच्या फळाफुलांनी शोभायमान झ ाालेली असतात. त्या वनांचे सौंदर्य नेत्रांनी पीत तो स्वयंबुद्ध मंत्री पर्वतावर जाऊन पोहोचला.

प्रथम देव ज्यांची पूजा करीतात, अशा अकृत्रिम जिनमंदिरांना प्रदक्षिणा घातली. नंतर भक्तिपूर्वक पुन्हा पुन्हा नमस्कार करुन पूजा केली. या रीतीने क्रमाने भद्रशाल वगैरे वनांतील अकृत्रिम जिनबिम्बांची वन्दना करुन क्षणभर विश्रांती साठी तो एका शिलाखण्डावर एसला असता त्याने दोन मुनी आकाशातून विहार करीत त्याचे स्थानी येत असलेले पाहिले. तो चटकन विनयपूर्वक उठून उभा राहिला . ते मुनि आकाशातून उतरुन आनंदाने शिलाखण्डावर बसताच स्वयंबुद्ध मंत्र्याने त्यांना नमस्कार केला व विनयाने म्हटले - - हे स्वामिन् ! या जगात प्रसिद्ध अशा विद्याधरांचा अधिपति राजा महाबल आहे. त्याचा मी एक नम्र सेवक आहे. तो राजा भव्य आहे की अभव्य याबद्दल मला संशय येतो. कृपया माझा हा संदेह आपल्या उज्वल ज्ञानकिरणांनी दूर करावा.

स्वयंबुद्ध मंत्र्याचे बोलणे थांवताच त्यांच्यातील आदित्यगति नावाच्या अवधिज्ञानी मुनींनी म्हटले- हे भव्य आत्मन् ! तुझा स्वामी हा भव्य जीवच आहे. जंबुद्धीपातील भरत क्षेत्रात तो स्वत:च्या दहाव्या भवात पहिला तीर्थंकर होणार आहे. त्याने आत्मकल्याणासाठी धर्माचे बीज पूर्वजन्मात पेरलेले आहे. त्या पूर्वजन्माची मी तुला थोडक्यात माहिती सांगतो ती ऐक, -

जंबुद्धीपात मेरुपर्वताच्या पश्चिमेला विदेह क्षेत्रातगन्धिल नावाचा देश आहे. त्यात सिंहपूर नावाचे एक नगर आहे. त्या नगरात श्रीषेण नावाचा राजा होता. त्यास सुंदरी नावाची पत्नी होती त्यांना दोन मुले होती. ज्येष्ठ पुत्राचे नाव जयवर्मा आणि छोटया मुलाचे नाव श्रीवर्मा असे होते. श्रीवर्मा हा मातापित्यांचा अतिशय लाडका होता. इतर साऱ्या जनतेने देखील त्यांच्यावरच प्रेमाचा वर्षाव केला. यास्तव ज्येष्ठ पुत्र जयवर्मा याची उपेक्षा करुन श्रीषेण राजाने श्रीवर्माला आपले राज्य दिले. या अपमानाने जयवर्माला वैराग्य झाले. त्याने जिनदीक्षा घेतली.

दीक्षा घेऊन त्याला फारसे दिवस झाले नव्हते. तोच एके दिवशी त्याने आकाशातून जाणाऱ्या विद्याधराला पाहिले. त्याचे ऐश्वर्य पाहून जयवर्माच्या मनाला मोहाने घेरले व त्याने निदान केले की, पुढील भवात मला विद्याधराचा जन्म मिळावा. या सुखस्वप्नांत गर्क असताना त्याला एक विषारी नागाने दंश केला. मूत्यूने त्याच्यावर विजय मिळविला. पण् विद्याधर होण्याच्या त्याच्या मानसिक भावनेला-अभिलाषेला-अनुसरुन तो विद्याधरांचा अधिपति महाबल राजा झाला.

बोलता बोलता क्षणभर थांबून मुनिराजांनी पुरश्च म्हटले- हे भद्र ! आज रात्री महाबलाने दोन स्पप्ने पाहिली आहेत. त्यात तुझ्याशिवाय इतर तीन मंत्र्यांनी त्यास बळजबरीने चिखलात फसविले अन् तू त्या फसलेल्या राजास चिखलातून वर उचलून सिंहासनावर बसविलेस. असे दृष्य त्याने पहिल्या स्वप्नात पाहिले. शिवाय रसरसलेल्या अग्निची ज्वाला क्षणाक्षणाला क्षीण होत असल्याचे दृष्य त्याने दुसऱ्या स्वप्नात पाहिल. या दोन स्वप्नांना पाहून तो तुझी मार्गप्रतिक्षा करीत आहे. यास्तव तू ताबडतोब तिकडे जा. तो सांगण्यापूर्वीच तुझ्या तोंडून ही दोन स्वप्ने ऐकून तो आश्चर्यचकित होईल. तुझ्यावर त्याची अमाप श्रद्धा बसेल. त्यामुळे तुझ्या म्हणण्याप्रमाणे तो आनंदाने वागत राहीले. पहिल्या स्वप्नाने त्याला पुढील भवात प्राप्त होणाऱ्या महान ऐश्वर्याची सूचना केली आहे. दुसरे स्वप्न तो आता तुमचा फारच थोडया दिवसाचा सोबती आहे असे सुचविते. त्याचे आयुष्य आता केवळ एक महिन्याचे शिल्लक राहिले आहे. म्हणून तू जावून त्याला आत्मकल्याणाचा मार्ग दाखीव.

मुनिराजांचे ते बोलणे ऐकताच स्वयंबुद्ध थोडासा अस्वस्थ झाला. मुनिराजांना नमस्कार करुन तो ताबडतोब आपल्या नगराला परतला. राजा महाबल आपलीच वाट पाहत आहे असे त्याला दिसले. मुनीच्या पवित्र वाणीतून ज्या गोष्ठी बाहर पडल्या होत्या त्या सर्व त्याने राजास निवेदन केल्या.

बुद्धिमान धीरवीर महाबलाने आपले आयुष्य थोडे आहे हे जाणून धर्मध्यानात आपला काळ व्यतीत करण्यास आरंभ केला. आपल्या बागेतील जिनमंदिरात अष्टान्हिक पूजेची व्यवस्था त्याने करविली. आपले राज्य अतिबल नावाच्या आपल्या मुलाला दिले. व गुरुच्या साक्षीपूर्वक जिवंत असेपर्यत सर्व परिग्रहांचा त्याग करुन सल्लेखना धारण केली. मृत्युकाल जसजसा जवळ येऊ लागला तसे पंचपरमेष्ठीचे चिंतन करण्यास त्याने आरंभ केला. दोनींही हात जोडून मस्तकावर ठेवले आणि मनातल्या मनात पंचनमस्कार मंत्रांचा जप करीत व आपलया शुद्ध आत्मस्वरुपाचे चिंतन करीत स्वयंबुद्ध मंत्र्यासमोर त्याने आनंदाने देह ठेवला.

# ललितांग देव

राजा महाबलाच्या मृत्युने सारी नगरी शोकसागरात बुडाली. पण दुसऱ्या ऐशान स्वर्गातील श्रीपूभ नावाच्या विमानात आनंदोत्सव चालू होता. कल्पवृक्षांच्या द्वारा पुष्पवृष्टी होत होती. दुन्दुभीचा धीरगंभीर आवाज वातावरणात घुमत होता. चारी बाजूंनी देवांचा समूह जयजयकार करीत एकत्र जमत होता.

उपपाद शय्येवर निद्रेतूत जागा हेऊन तरुणासारखा बसलेला ललितांग देव हे सारे पाहून आश्चर्यचकित झाला. मी कोण ? येथे कसा आलो ? हे रमणीय स्थान कोणते ? हे सारे लोक आनंदाने जयघोष का करीत आहेत ? याच विचारात तो अडकला होता. परंतु एका पळातच त्याच्या अन्तरी ज्ञानाचा उदय झाला आणि त्याच्या प्रश्नांची उत्तरे आपोआप अलगडली गेली. त्याने जाणले- हा स्वर्ग आहे. हे प्रमाण करणारी देव आहेत. हे विमान आहे. ओठातच मंदस्मित करणाऱ्या या देवांगना-अप्सरा आहेत. पूर्वभवात मी महाबल राजा होतो. हे सारे वैभव मला माझ्या त्यागाने मिळाले आहे.

इतक्यात काही देवांनी त्याचा मोठमोठयाने जयजयकार केला आणि आपले मस्तक नमवून आदराने म्हटले- भो स्वामिन् ! स्नानाची सामुग्री तयार आहे. प्रथम स्नान करा. त्यानंतर जिनेंद्र देवांची पूजा करा. तद्नंतर देवसेनेचे निरीक्षण करा, नाटयशाळेत जाऊन उप्सरांचे मनोहर नृत्य पहा. अन् शेवटी देवांगनांचा सन्मान स्वीकारा. देव होऊन जन्मल्याने केवळ एवढयाच गोष्टीची प्राप्ती होणार आहे ना !

ललितांगाने उठून ही सारी कार्ये पार पाडली. शेवटी तो आपल्या सुंदर देवांगनांच्या समूहात जाऊन पोहोचला. अन् ज्या पूर्वभवातील त्यागाने त्याला या महान ऐश्वर्याची प्राप्ती झाली होती त्यात तो मोहून गेला. कालचक्र फिरत होते. पण देवांगनांच्या सौंदर्यावर लुब्ध झालेल्या ललितांगाला ते चक्र क्षणभर थांबल्यासारखे वाटले.

त्याच्या दीर्घ आयुष्यातील जेव्हां एक मोठा कालभाग व्यतीत होऊन गेला. तेव्हा त्यास स्वयंप्रभा नावाच्या एका नवीन देवांगनेची प्राप्ती झाली. भुंग्यांना ज्याप्रमाणे नवीन आंब्याच्या वृक्षावरील मोहोर अतिशय प्रिय होतो, त्याप्रमाणे ललितांगास ती अत्यंत प्रिय झ ाली आणि तो तिच्या स्वरुपावर अत्यंत आसक्त झाला. तिच्यासह तो कधी सुंदर वनात जाऊन विहार करी, तर कधी निषेधाचलावर जाऊन तिच्याशी रममाण होई. कधी मेरु पर्वतावरील जिनालयाची वंदना करण्यास जाई, तर कधी नंदीश्वर द्वीपात जाऊन पूजा करी. याप्रमाणे स्वयंप्रभेबरोबर विहार करीत असताना त्याच्या आयुष्यातील शेष दिवस व्यतीत होत

गेले व एक दिवस जन्मापासून त्याच्या विशाल वृक्षस्थलावर असलेली टवटवीत पुष्पमाला अशी म्लान होऊन गेली की जणू त्यास मृत्यूने अलिंगनच दिले आहे.

मूत्यूच्या आगमनाच्या या सूचनेने त्याच्या ह्दयाने हाय खाल्ली त्याच्या शरीरीचे तेज मंद झाले, मुख निस्तेज झाले. आता त्यास पूर्वी भोगलेल्या सुखांची आठवण होऊ लागली. त्या सौख्यदायक क्षणांच्या आठवणी आता त्याच्या ह्दयात काटयाप्रमाणे सलू लागल्या. ते सुख , दु:ख बनून त्याला रडवू लागले त्याला सर्वत्र मूत्यूची भीषण छाया भिववू लागली. त्याची दीन अवस्था पाहून त्याचे सेवक, देवदेखील दु:खी झाले. पण ते बिचारे तरी काय करु शकत होते. ?

ललितांगदेवाच्या वक्षस्थलावरील माला कोमेजून गेली ही बातमी परमाणूच्या गतीपेक्षादेखील अत्यंत जलद गतीने स्वर्गात य टोकापासून ते दुसऱ्या टोकापर्यंत पसरली. क्षयरोग्यांच्या दवाखान्यात कोण्या क्षयरोग्याचा मृत्यूसमय जवळ आल्याची बातमी समजताच साऱ्यांची अंत:करणे जशी क्षणभर अज्ञात भयाने थरारुन जातात, तशी ही बातमी ऐकताच स्वर्गवासीयांची अवस्था झाली. परंतु या मूत्युलोकात रात्रंदिन मरणाऱ्या मानवांना पाहून आपण क्षणभर खिन्न होतो व दुसऱ्या क्षणी ते दु:ख विसरुन पुन्हा आपल्या कार्यात गढून जातो. तसेच सारे स्वर्गवासी आपआपले प्राप्त सुख भोगण्यात दंग झाले. परंतु काही सूज्ञ देव ललितांगकडे आले आणि त्याचे दु:ख दूर करण्यासाठी त्यांनी म्हटले-तो देव ! जन्म-मरणाच्या चक्रातून या संसारात कोण सुटू शकले ? या स्वर्गात जो येतो त्यास एक दिवस येथून अवश्य जावे लागते. कारण आयुष्य पूर्ण झाल्यानंतर एका क्षणासाठी देखील येथे कोणास राहता येत नाही. नेहमी प्रकाशाने भरलेला हा स्वर्ग देखील मूत्यूला आलिंगन देण्यास निघालेल्या देवास अन्धकारानें व्याप्त झाल्याप्रमाणे वाटतो. कारण त्याच्याजवळील पुण्यरुपी दिव्याची ज्योत विझ ालेली असते. पुण्याचा क्षय झाल्यानंतर आपली आवडती माणसेदेखील आपल्याशी चांगल्या रीतीने वागत नाहीत. कालपर्यंत जे सेवक नेत्राच्या केवळ संकेताने घाबरत होते तेच त्याच्या मूत्यूचे चिन्ह पाहून बोलाविल्यानंतर देखील येत नाहीत. अधिक काय सांगावे ? स्वर्गातून च्यूत होण्याची वेळ आली असता देवांना जे दु:ख प्राप्त होते, तसे दु:ख नारकी जीवांना देखील होऊ शकत नाही. या वेळी आपण स्वत:या दु:खाचा अनुभव घेत आहात. उगवलेला सूर्य जसा निश्चित मावळणार असतो तसेच मिळालेल्या स्वर्गसुखांचा देखील निश्चित विनाश ठरलेला आहे. म्हणून हे आर्य ! वाईट योनीमध्ये नेणाऱ्या या शोकाचा त्याग करा आणि धर्मामध्ये आपले मन लावा. कारण धर्मच त्राता व कल्याणकर्ता आहे.

या उपदेशाने ललितांगाचा आत्मा जागा झाला. त्यान धैर्याने धर्माचा स्वीकार करुन निर्भय चित्ताने आपल्या शरीराचा त्याग केला.

वज्रजंघ

जम्बुद्वीपात मेरु पर्वताच्या पूर्वेला विदेह क्षेत्रात पुष्कलावती नावाचा देश आहे. तेथे उत्पलखे्टक नावाचे नगर असून वज्रबाहू राजा राज्य करीत होता. त्यांच्या राणीचे नांव वसुंधरा असे होते . ललितांगदेव स्वर्गातून च्युत होऊन त्यांना वज्रजंध नांवाचा पुत्र झाला. प्रतिपदेची चद्रकोर क्रमाने वाढत जाऊन पुनवेचा चंद्र बनताच त्याचा प्रकाश जगभर फुलवा तसाच बाल वज्रजंध क्रमाने वाढून तरुण होताच त्याचे सौंदर्य फुलुन निधाले . त्यांचे काळे कुरळे दीर्घ केस, कानापर्यतचे विशाल नेत्र , चंदनाचा लेप दिलेले विशाल वक्षस्थल आणि बाहू पाहून कोणाला आनंद होत नसे ? शिवाय तो सर्व कालात प्रवीण , विनयी व जितेन्द्रिय होता. तारुण्यात आल्यावर तो आपल्या पूर्व भवातील स्वयंप्रभा देवांगनेवरील प्रेमस्मरणाने उदास बनून इतर कुमारिकांच्या विचारापासून अलिप्त रहात असे.

ललितांगदेव स्वर्गातून च्युत होताच स्वयंप्रभा देवांगनेची देखील चक्रवाकाचा विरह झालेल्या चक्रवाकीप्रमाणे अवस्था झाली वर्षा ऋतूत कोकिळा आपला कुऽहू कुऽहु असा मंजुळ आलाप काढणे बंद करते. तसेच स्वयंप्रभेने आपले मधुर व गोड बोलणे बंद केले. रात्रंदिवस ती पतिविरहाने व्याकुळ होऊन स्वस्थ बसत असे. देवलोकांत हा नवीन प्रकार होता तरी देखील एका देवाने तिचा शोक दूर करुन सन्मार्गाला लावले आणि तिने धर्मचिंतन करीत प्राणत्याग केला.

विदेहक्षेत्रात पुण्डरीकिणी नांवाच्या नगरीत वज्रदंत नावाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या राणीचे नांव लक्ष्मीमती असे होते. स्वयंप्रभादेवी स्वर्गातून च्युत होऊन तिच्या पोटी श्रीमती नावाची मुलगी झाली. चैत्र महिन्यात चंद्राच्या कला जशा लोकांना अधिक आनंदित करतात, तसेच नवतारुण्यात प्रवेश करणारी श्रीमती देखील लोकांना अधिक आनंदित करु लागली.

एके दिवशी श्रीमती आपल्या राजमंदिरात झोपलेली होती. त्या दिवशी त्या नगरातील बागेत असलेल्या यशोधर नावाच्या मुनींना केवलज्ञान झाले. त्यासाठी स्वर्गातील देव आपल्या ऐश्वर्यासह त्यांची पूजा करण्यासाठी आले त्यांचा कोलाहल ऐकून श्रीमती झोपेतून जागी झाली . देव तिकडे जात असलेले पाहून तिला पूर्वजन्माचे स्मरण झाले आणि ती

तत्काळ मूर्च्छित झाली तिच्या दासीने शीतलोपचार केल्याने ती शुद्धीवर आली पण तिने मौन धारण केले.

तोच तिचे माता पिता देखील त्या स्थानी आले. आपल्या मुलीची ती अवस्था पाहून ते फार दु:खी झाले त्यांनी श्रीमतीला मूर्छित होण्याचे करण विचारले पण तिने आपल्या मुखातून एक शब्द देखील काढला नाही. तेव्हा अनुभवी वज्रदंताने आपल्या राणीस म्हटले देवी ! कोणताही रोगाचा संशय घेऊन व्यर्थ भयभीत का होतेस ? तुझी मुलगी तारुण्यात आली आहे. तिचा हा विकार कोणत्या तरी मानसिक रोगाचा सूचक आहे. ऐवढे बोलून वज्रदंताने पंडिता दासीला मुलीजवळ ठेविले आणि तो राणीसह आपल्या महालात निघून गेला.

पंडित दसी अतिशय चतुर होती. श्रीमतीच्या मस्तकावर प्रेमाने हात फिरवीत तिते म्हटले हे मुली माझे पंडिता नांव खरोखरच सार्थ आहे, मी कोणत्याही कार्याचा योजन करण्यात चतुर आहे. याशिवाय मी तुला मातेसारखी असून तुझी प्रिय मैत्रीण देखील आहे. म्हणून तू आपले ह्दय मजजवळ मोकळे करुन सांग पाहू ! जगात मातेपासून कोणतीही गोष्ट लपविली जात नाही बहुतेक तारुण्याच्या प्रथमा अवस्थेत असे होत असतेच तेव्हां संकोच सोडून तू आपल्या मूर्च्छेचे कारण सांग-

दासीचे हे बोलणे ऐकून श्रीमतीने लाजून जमिनीकडे पहात म्हटले - हे पंडिते, मी लज्जेत बुडून गेल्यामुळे अत्यंत दु:खी झाले. आहे मी तुला मातेसमान मानीत असून तू मला चिरपरिचित आहेस. यासाठी जी गोष्ट मी इतर कोणालाही सांगू शकत नव्हते, ती आज तुला सांगते आज स्वर्गातील देव येथे आलेले पाहून मला पूर्वजन्माचे स्मरण झाले. यापूर्वी मी स्वर्गात ललितांग देवाची स्वयंप्रभा नावाची देवांगना होते. मी त्याच्याबरोबर अनेक प्रकारचे भोग भोगिले. स्वर्गातून तो च्युत झाल्यानंतर सहा महिन्यांनी मी तेथून च्युत होऊन येथे जन्मले आहे.

असे बोलताना श्रीमतीनं भावनेच्या आवेगात येऊन थोडयाशा उच्च स्वरात म्हटले - हे पंडिते ! इकडे बध, ललितांग आज देखील माझ्या मनोमंदिरातील सिंहासनावर विराजमान झाला आहे. किती सुंदर आहे त्याची मूर्ति ! कसा धीरवीर आणि शांत दिसत आहे ! वस्त्र, आणि अलंकारांनी सुशोभित त्याचे शरीर या वेळी मी प्रत्यक्ष पहात आहे. त्याच्या हातांच्या सुखद स्पर्शाचा अनुभव मला आजही प्रतिभासत आहे. असे म्हणत श्रीमतीने त्याला अलिंगन देण्यास

लतेप्रमाणे कोमल असलेले आपले बाहू पसरले. पण क्षणातच तिच्या मोहनिद्रेचा भंग झाला आणि ती विरहाने व्याकुळ होऊन रडू लागली .

स्फुंदत स्फुंदत तिने म्हटले- हे माते तो या मृत्यूलोकात कोठेतरी जन्मला असेल त्याला तूच शोधून काढू शकतेस. तुझ्याशिवाय इतर कोणी हे कार्य करु शकणार नाही. तु खरोखरच पंडिता आहेस . तुझ्या मायेचा हात माझ्या मस्तकावर असताना माझ दु:ख नाहिसे होईल ! क्षणभर तिने थांबून विचार केला आणि पुन्हा म्हटले - मला आता एक उपाय सूचला आहे. मी माझ्या पूर्वभवातील काही प्रसंग एका चित्रपटावर काढून देते. त्यात काही गूढ प्रसंग मी चित्रित करणार आहे. ते पाहून एखादा धूर्त माझा पूर्व पति असल्याचे सोंग करु लागेल. तेव्हा तू त्यास या चित्रपटातील गूढ प्रसंगाचा खुलासा विचार. जर त्याला याचे उत्तर देता आले नाही, तर तू आपल्या स्मित हास्याने त्यास लज्जित करुन चालतली हो असे म्हणून तिने चित्रपट रेखाटून तो तिला दिला.

श्रीमतीचे बुद्धिसौंदर्याने भरलेले हे बोलणे एकून त्या चतुर दासीने हसत म्हटले- हे मुली ! मी जिवंत असतांना तुझा मन:संताप कसा राहू देईन ? आम्रवृक्षाला मोहोर आला असताना कोकिळा दु:खी कशी राहू शकते ? तुझ्या पूर्व पतीचा शोध लावून मी लौकरच परत येईन. मला कोणतीही गोष्ट असाध्य नाही. यास्तव तू शोकाचा त्याग कर आणि स्नानादिक नित्य क्रिया करु लाग. मी तुझ्या पतीचा शोध करावयास जाते.

श्रीमतीला शांत करुन ती चतुर दासी चित्रपट घेऊन आपल्या घरी गेली व सर्व तयारी करुन निघाली फिरत फिरत ती एका जिन मंदिराजवळ आली आणि चित्रपट पसरुन एका कडेला बसली जिन मंदिरात दर्शनास येणारे लोक त्या चित्रपटाकडे पाहून थांबत, पण त्यातील अर्थ न समजल्याने ते पुढे जात. थोडयाच वेळात दोन तरुण त्या स्थानी आले. त्या चित्रपटाकडे पाहून ते आपआपसात बोलू लागले - यावरुन असे वाटते की, कोण्या एका राजकन्येला आपल्या पूर्व जन्माचे स्मरण होऊन तिने गत जन्मातील प्रसंग या चित्रपटावर रेखाटले आहेत.

दोधेही मनातल्या मनात हसत दासीजवळ आले आणि त्यांनी म्हटले---- हा कोणाचा चित्रपट आहे ? आम्ही या राजकन्येचे पूर्वजन्माचे पति आहोत.

हे ऐकून दसीला खूप हसू आले. परंतु त्या दोन धुर्तानी जेव्हा आपले म्हणणे पुन्हा पुन्हा त्याच शब्दात कथन केले - तेव्हा तिने चित्रपटातील गूढ प्रसंगाबद्दलचा प्रश्न टाकला . तेव्हा ते निरुत्तर झाले आणि लज्जित होऊन पुढे चालते झाले.

इतक्यात वज्रजंघाने जिनमंदिरात प्रवेश केला. प्रथम त्याने जिनालयाला प्रदक्षिणा घातली. नंतर जिनेंद्रदेवाची स्तुति करुन नमस्कार केला. तदनंतर तो त्या चित्रपटाजवळ आला. त्याकडे पाहताच त्याने स्वत:शीच म्हटले - या चित्रपटातील प्रसंग माझ्या आयुष्यात घडल्याप्रमाणे वाटतात. मी माझ्या पूर्वजन्मातील प्रसंगच या चित्रात पहात आहे, असे माला वाटू लागले आहे. हा ललितांग देवाप्रमाणे स्पष्ट दिसतो. आणि या स्त्रीचे रुप प्रत्यक्ष स्वयंप्रभेप्रमाणेच आहे. यात पुष्कळशा गोष्टी गूढ ठेविल्या आहेत. हा ऐशान स्वर्ग दाखविला आहे ? त्यात हे श्रीप्रभू विमान चित्रित केले आहे. या विमानाचा अधिपति ललितांग देव अन् त्याच्याजवळ बसलेली ती स्वयंप्रभा नाही. वज्रजंघ चित्र पहात आपल्याशीच आश्चर्योद्गार काढीत होता. त्याच्या मनात विचारांचे वादळ उठले. त्याला कोणत्याही गोष्टीचा निर्णय घेंणे अशक्य झाले. हळू हळू त्याची व्याकुळता वाढत गेली त्याने आपल्या दोन्ही हातानी भ्रमलेले मस्तक घट्ट दाबून धरले. चोहोकडे अन्धकार पसरत चालल्याप्रमाणे त्याला वाटले. भिंतीचा आसरा ध्यावा म्हणून हात धडपडले. आणि हळू हळू मूर्च्छित होऊन तो जमिनीवर पडला.

परिचारकांच्या प्रयत्नाने तो सावध झाला. पंडिता दासी जवळच बसलेली त्याने पाहिले. त्याने तिला विचारले - भद्रे ! या चित्रात माझ्या पूर्वभवातील प्रसंग कोणी रेखाटलं आहेत .

दासीने म्हटले - कुमार ! तुझ्या मामीला श्रीमती नावाची एक मुलगी आहे. ती अजूनही अविवाहित आहे. तिनेच या चित्रात आपले हस्तकौशल्य दाखविले आहे. अनेक राजकुमार तिचा शोघ करण्यात दंग आहेत. तिने मला तुझ्या शोधार्थ पाठविले आहे. ती आपल्या पूर्वभवातील पतीचे नांव ललितांग आहे. असे म्हणते. परंतु आपण याच भवात साघात् ललितांग आहात . कारण आपले अंगप्रत्यंग खरोखरच अत्यंत सुंदर आहे.

दासीच्या या उत्तराने प्रफुल्लित होऊन राजकुमार वज्रजंघाने तो चित्रपट आपल्या हाती घेतला आणि आपले एक चित्र त्याने दासीच्या स्वाधीन केले. दोन्ही चित्रात बहूतश: सारखेच प्रसंग रेखाटले होते. तदनंतर राजकुमार जिनमंदिरातून बाहेर पडला व ते चित्र घेऊन दसी तेथून परतली .

दासीचे प्रफुल्लित मुख पाहून श्रीमतीस आपली मन:कामना पूर्ण झाल्याप्रमाणे भास झाला. दासीच्या मुखातून सर्व समाचार ऐकण्यासाठी ती अतिशय आतुर झाली. परंतु दासीला विनोद आठवत होता. श्रीमतीला बनविण्यात - तिची मस्करी करण्यात तिला आनंद वाटत होता. शेवटी जेव्हा अति उत्कंठेने तिचा चेहरा रडवेला झाला. तेव्हा तिने आपल्या

चातुर्याने रसभरित वर्णन करीत कुमार वज्रजंघाचे चित्र तिच्यासमोर घरले .

त्या चित्राकडे खूप वेळ एकाग्रतेने पाहताच श्रीमतीच्या नेत्रात आनंदाश्रू चमकले. आपले मनोरथ पूर्ण होणार याचा तिला विश्वास वाटला व तो त्या चमुर दासीकडे आतुरतेने पाहू लागली. तेव्हा पंडिता म्हणाली - मुली ! विश्वास ठेव, तुझ्या प्राणनाथाबरोबर लवकरच तुझ् मिलन होणार आहे. आपले चित्र देऊन गुपचूप निघून गेला. म्हणून तू अविश्वास दाखवू नकोस. त्याचे तुझ्यावर अत्यंत प्रेम जडले आहे, याची मी पक्की खात्री करुन घतली जाते वेळी तो दरवाजात खूप वेळ बावळ्यासारखा थांबला. तो पुन: माझ्याकडे पहात होता. कधी हसे, तर कधी दूर क्षितिजाकडे आत्मविस्मृत नजरेने पहात राही व कधी उष्ण दीर्ध नि:श्वास टाकी. या सर्व चिन्हांवरुन त्याला कामज्वर झाला आहे असे मी ओळखले. तो तुझ्या पित्याचा अर्थात वज्रदन्त राजाचा भाचा आहे. कुलिन, चतुर आणि सुन्दर तर आहेच, पण वराला योग्य असे सर्व गुणही त्याच्यात विद्यमान आहेत. म्हणुन तुझे माता पिता देखोल त्याच्याशी तुझा विवाह करुन देण्यास अवश्य सहमत होतील. यासाठी तू घैर्य धर. तुझ्या प्रियकराबरोबर तुझे लवकरच मीलन होईल .

याप्रमाणे पंडिता दासीने वज्रजंघाचा आनंददायी समाचार ऐकवून श्रीमतीस सुखी करण्याचा भरपूर प्रयत्न केला. परंतु लि आहपले आणि वज्रजंघाचे मीलन होईल याची खात्री वाटली नाही.

इकके वज्रदन्त राजाने ती बातमी ऐकून आहपल्या मेहूण्याचे राजा वज्रबाहूस-आमत्रण पाठविले. वज्रबाहू राजाबरोबर त्यांची बहीण आणि भाचा दोधेही आले. त्या सर्वांना पाहून वज्रदंत राजाला अतिशय आनंद वाटला. त्याने त्यांचा यथायोग्य आदर सत्कार केला.

अतिथिसतरानंतर ते समाधानपूर्वक एकत्र बसले असता वज्रदन्ताने आपल्या मेहूण्याला म्हटले - वज्रबाहू ! आज तू आपली पत्नी व पुत्र या सहित माझ्या घरी आलेला आहेस, यामुळे माझं ह्दय अत्यंत प्रसन्न झाले आहे. या आनंदसमयी तुझ्या इच्छेप्रमाणे मजजवळील कोणतीही वस्तु मागू शकतोस ! तुला भेट देण्यायोग्य अशी सुंदर वेळ पुन्हा केव्हां येईल ? म्हणून माझ्या घरातील जी वस्तू तुला चांगली वाटत ती तू घ्यावी .

चक्रवर्ती वज्रदंताचे ते प्रेमळ भाषण ऐकून राजा वज्रबाहूने म्हटले - आज तुम्ही माझा जो अपूर्व सन्मान करीत आहात तोच माझ्यासाठी सर्वात बहुमूल्य वस्तु आहे. आपल्या कृपेने माझ्या घरी कोण्त्याही वस्तुची कमतरता भासत नही . तेव्हा मी आपल्याकडे कोणत्या वस्तूची मागणी करु ? आपल्या कृपापूर्ण दृष्टीपुढे इतर साऱ्या वस्तू तुच्छ आहेत. म्हणून आज तुम्ही

मला जे स्नेहदान केलेत, त्यानेच मी आज कृतकृत्य झालो आहे. व माझे जिवित सफल झाले आहे, असे मी मानतो. तरी देखील मी आपल्या वचनाची अवहेलना करण्यास असमर्थ आहे. म्हणून मी आपणांस प्रार्थना करतो की , आपली कन्या श्रीमती माझ्या वज्रजंध नावाच्या पूत्राला देण्याची कृपा करावी. हा आपला भाचा आहे. पुन्हा जया घराण्यात आपल्या स्वर्गीय पित्याने आपली मुलगी दिली, तेथे आपण आपली कन्या देतांना संकोच बाळगण्याचे काहीच कारण नाही. जनतेत अशी म्हणही रुढ आहे. की, अतिथी हा कन्येचा अधिकारी असतो तेव्हा आपण आपल्या भाच्यास आपली मुलगी देऊन मला अनुगृहीत करावे. इतर धन संपत्ति वगैरे आपणापासून मला अनेक वेळा मिळालेली आहे.

महाराज वज्रदंतांनी अतिशय आनंदाने त्यांच्या या मागणीस अनुमति दिली, सुयोग्य वराबरोबर सुयोग्य कन्येचा विवाह होणार हे पाहताच मंत्री, सेनापती, पुरोहित, सामन्त व नगरनिवासीजनांना आनंद झाला. सारेजण विवाहाची तयारी करण्यात गुंगून गेले.

चक्रवर्ती वज्रदन्ताच्या आज्ञेने विश्वकर्माने रत्ने आणि सुवर्ण यांनी विवाहमण्डप तयार केला. मण्डपाच्या अध्यभागी पद्मराग मण्यांनी एक वेदी बनविली, मण्डपाच्या आतील द्वारावर दोहोबाजूस मंगलद्रव्ये ठेविली. राजवाडयाच्या अंगणात चन्दनाच्या पाण्याचा सडा शिंपडला गेला.

शुभ लग्नघटिका होताच पवित्र जलाने भरलेल्या सोन्याच्या कलशांनी वरास अभिषेक घातला गेला. त्यावेळी राजमंदिरात शंख , दुन्दुभि वगैरे वाद्यांचा मंगल आवाज दुमदुमून गेला. सारे लोक फुले आणि अक्षता टाकून वधू-वरास आशीर्वाद देत होते. अभिषेकानंतर वध-वरांनी सुंदर वस्त्रे परिधान केली. आणि ते देघे प्रसाधन गृहात गेले. तेथे त्यांनी मंगल विवाहासाठी योग्य व उतोत्तम अलंकार घातले, तद्नंतर ते विवाहवेदीवर आले. त्यावेळी नगाऱ्याचा गंभीर आवाज, गायिकांचे मंगल गायन आणि बन्दीजनांचे मंगलपाठ यांचा आवाज एकत्र मिळून राजभवनाच्या कानाकोपऱ्यात घुमू लागला.

कन्यादानाचा शुभ मूहूर्त येताच वज्रदन्ताने सोन्याची झारी आपल्या हाती घेतली आणि वज्रजंघाच्या हातावर संकल्प सोडून जलधारा सोडली. जेव्हा वज्रजंधाने श्रीमतीचे पाणीग्रहण केले. तेव्हा तिच्या कोमल स्पर्शाच्या सुखानुभवाने वज्रजंधाचे नेत्र क्षणभर अर्धोन्मीलित झाले. श्रीमतीच्या शरीरावर देखील रोमांच उभे राहिले.

विवाहाच्या दुसरे दिवशी सायंकाळी वधू-वर परमपावन महापूत जिनमंदिरात गेले. वज्रजंघ पुढे चालला होता व श्रीमती त्याच्या पाठीमागून जात होती. पूजेची सामुग्री घेऊन

सेवक बरोबर येत होते. जिनमंदिरात गेल्यानंतर दोघांनी प्रथम प्रदक्षिणा घातल्या. तद्नंतर गर्भगृहात जाऊन उत्साहाने जिनेंद्र भगवंताची पूजा केली.

याप्रमाणे जेव्हा विवाहतील मंगलकार्ये आनंदाने पार पडली, तेव्हा वज्रदन्त महाराजांनी वधू-वरांना निरोप दिला व त्याच्या बरोबर हत्ती, घोडे , रथ, रत्ने वगैरे पुष्कळसे धन दिले.

वज्रजंधाने श्रीमतीबरोबर आपल्या नगरात प्रवेश केला तेव्हा नगरवासीयांच्या उत्साहाचा आणि प्रेमाचा घरांवरील छतांवरुन फुलांच्या रुपाने वर्षाव होऊ लागला. चोही बाजूंनी आशीर्वादाबरोबर पुष्पे व अक्षतांची वर्षा होऊ लागली. राजमहालात पोहोचताच दोघांना आनंदाने हर्षवायु झाल्यासारखे् वाटू लागले.

एके दिवशी वज्रबाहू आपल्या महालातील गच्चीवर बसून आकाशाची शोभा पहात होते. क्षणाक्षणाला मेघांचा आकार व रंग बदलत होता. ते पाहून त्यांना संसारबद्दल विरक्तता वाटू लागली. ऐश्वर्य मेघांप्रमाणे क्षणभंगुर आहे. हे जाणून त्यांनी आपला पुत्र वज्रजंध यास राजय देऊन आपण जिनदीक्षा घेतली .

तिकडे वज्रदंत चक्रवर्तीच्या जीवनात देखील अशीच एक घटना घडली. एके दिवशी ते राजदरबारात सिंहासनावर बसले होते. माळ्याने यांना नुकतेच फुललेले सुंदर कमलफुल भेट दिले. राजाने ते फुल हाती घेतले. त्याचा सुवास ध्यावा म्हणून वर उचलताच त्यांची दृष्टी कमळात मृत होऊन पडलेल्या भुंग्याकडे गेली. त्याला पाहताच वज्रदंत विचारात पडले. ते विचार करु लागले- हा भुंगा कमळातील रसपान करण्याच्या लोभाने आला होता. रसपान करीत असता पूर्ण मावळला. कमळाच्या पाकळ्या मिटल्या व हा आत अडकला जाऊन मृत्युमुखी पडला. इंद्रियांचा भोग घेत राहिल्यास त्याचेही हेच फळ मिळणार आहे.

चक्रवर्तीनी असा विचार करुन आपले साम्राज्य जेष्ठ पुत्रास देण्याचे ठरविले. परंतु म्हटले हे तात ! जर आपण या साम्राज्याचा त्याग करीत आहात तर मग मला या मोहजालात का अडकविता ? ज्या वस्तूस आपण त्याज्य मानता ती वस्तु आमच्यासाठी देखील त्याज्यच आहे. इतर मुलांनी देखील असेच उत्तर दिले. तेव्हा वज्रदंताने आपल्या अमिततेज पुत्राच्या बालकाला पुंडरीकाला राज्यावर बसवून जिनदीक्षा घेतली .

वज्रदंत आणि त्याच्या मुलानी जिनदीक्षा घेतल्याने राणी लक्ष्मीमती फारच चिंतातुर झाली. ती विचार करु लागली की एवढया मोठया साम्राज्याचे रक्षण एक छोटासा अइ ाान बालक कसा करु शकेल ? पुष्कळसा विचार करुन तिने विद्याधर कुमारांच्या हाती एक पत्र लिहून ते बंद केलेल्या करंडयात ठेविले अन् त्यांना आपला जावई वज्रजंध आणि मुलगी

श्रीमती यांच्याकडे पाठविले. पत्रात पुढीलप्रमाणे लिहिले होते चक्रवर्ती वज्रदंतू आपल्या पुत्रासह वनात निघून गेलेळळ. त्यांनी राज्यावर पुण्डरीकास बसविले आहे. पुण्डरीक लहान बालक आहे अन् आम्ही दोघी सासूसुना स्त्रिया पडलो म्हणून योग्य अधिपतीशिवाय हे राज्य नष्ट होत जाण्याचा संभव आहे, या राज्याच्या रक्षणाचा भार आपल्याबरच आहे, तेव्हा आपण ताबडतोब यावे,

विद्याधरकुमार तो करंडा घेऊन आकाशमार्गे निघाले व थोडयाच अवधीत उत्पलखेटक नगरास जाऊन पोहोचले राजमंदिराच्या दरवाज्यावर पोहोचताच द्वारपालाने त्यांना आत नेले त्या दोघांनी आत जाताच राजसभेस सिंहासनावर बसलेल्या वज्रजंघास नमस्कार केला व भेटीबरोबर आणलेल्या करण्डा त्यांच्यासमोर ठेविला. करण्डा उघडून वज्रजंघाने पत्र घेतले व वाचून त्याने ते राणी श्रीमतीस दिले. पिता व बंधू यांनी दीक्षा घेतल्याची बातमी वाचून श्रीमती अतिशय दु:खी झाली. वज्रजंघाने तिचे सांत्वन केले व तिच्यासह विचारविनिमय करुन आमंत्रणाप्रमाणे जाण्याचे ठरविले. त्या प्रमाणे मोठा सैन्यसमूह घेऊन तो पुण्डरीकिणी नगरीच्या मार्गास लागला.

क्रमश:प्रवास करीत तो एका सरोवराजवळ पोहोचला तेथेच त्याने त्या दिवशी मुक्काम ठोकला. सैग्याने तळ देण्यापूर्वी वज्रजंघ वायुवेगाने धावणाऱ्या घोडयावर बसून तेथे पोहोचला. मार्गातील धूलिकणांनी आणि सूर्याच्या तापदायक किरणांनी त्याचे मुख कोमेजून गेले होते. तो ताबडतोब आपल्या निवासस्थानी गेला आणि त्याने सरोवराच्या लाटेवरुन वहात येणाऱ्या शीतल वायूने आपला श्रमपरिहार केला.

इतक्यात दमधर आणि सागरसेन नांवाचे दोन मुनिराज आकाशमार्गाने विहार करीत वज्रजंघाच्या छावणीत येऊन पोहोचले. दोघानांही वनातच आहार घेण्याची प्रतिज्ञा केली. म्हणून ते चर्योसाठी वज्रजंघाच्या निवासस्थानाकडे निघाले मुनींना पाहताच वज्रजंध ताबडतोब उठला. त्याने त्यांना विधीपूर्वक अत्यंत सन्मानाने प्रतिग्रहादि भक्तिपूर्वक राणी श्रीमतीसह विशुद्ध परिणामपूर्वक आहार दिला. तो निरंतराय झाला म्हणून देवांनी पंचाश्चर्यवृष्टि केली.

आहार झाल्यानंतर वज्रजंधाने मनीस विचारले- हे भगवन् ! हे मतिवर , आनंद , धनमित्र आणि अकम्पन, मला स्वत:च्या बंधू प्रमाणे प्रिय वाटतात, याचे कारण काय असावे ? यांचा व माझा पूर्वजन्मीचा काही संबंध आहे की काय ? ते कृपा करुन आपण सांगावे तेव्हा मुनीश्वर राजांना म्हणालें- राजन् ! जम्बुद्वीपातील पूर्व विदेह क्षेत्रात वत्सकावती नावाचा देश आहे. त्यात प्रभाकरी नावाची एक नगरी आहे. हा मतिवर पूर्वजन्मात त्या नगरीचा

अतिगृध्र नावाचा राजा होता. तो अत्यंत विषयासक्त होता. त्यास अतिशय आरंभ अन् परिग्रहाच्या पापाने नरकायूचा बंध झाला. मृत्यूनंतर तो चौथ्या नरकात उत्पन्न झाला. पूर्वजनमी त्याने प्रभाकरी नगरीजवळील एका पर्वतावर पुष्कळसे घन गाडून ठेविले होते. म्हणून नरकातून निघून त्या पर्वतावर वाध होऊन जन्मला.

एके दिवशी प्रभाकरी नगरीचा राजा प्रीतिवर्धन जिंकण्याच्या इच्छेने लढावयास तयार झालेल्या आपल्या छोटया भावास परतवून त्याच पर्वतावर थांबला. आपल्या छोटया बंधूबरोबर तो तेथे बसला असताना पुरोहिताने येऊन म्हटले की, आज आपणास येथे मुनींना आहारदानाच्या प्रभावाने फार मोठा लाभ होणार आहे; पण मुनिराज येथे कसे येतील हाच महत्वाचा प्रश्न आहे. यावर आपणास मी एक उपाय सुचवितो, -नगरात अशी घोषणा केली जावी कि, आज राजासाठी अत्यंत भाग्याची अन् आनंदाची वेळ आहे. यास्तव सर्व नगरवासियांनी आपापली घरे सजवावात आणि घराच्या अंगणात व मार्गात सर्वत्र सुंगधी पाण्याचा सडा शिंपडून थोडी देखील जमीन दिसणार नाही, अशी फुले पसरावीत . असे केल्याने नगरात जाणारे मुनि तिकडे न जाता चर्येसाठी अवश्य येथे येतील .

पुरोहिताच्या या भाषणाने राजा प्रीतिवर्धनास आनंद वाटला . नगरात त्याने तशी आज्ञा देवविली. त्या दिवशी एका महिन्याच्या दीर्ध उपवासानंतर पिहितास्त्रव नावाचे मुनिराज आहारासाठी आले. राजाने त्यांना विधीपूर्वक आहार दिला. त्यामुळे तेथे पंचाश्चर्यवृष्टि झाली.

राजा अतिगृध्राच्या वाध बनलेल्या जीवाने देखील हे सारे पाहिले. त्यामुळे त्याला पूर्व जन्माचे स्मरण झाले. त्याने आपल्या क्रूरतेचा त्याग केला व तो एका शिलातलावर जाऊन बसला त्या मुनिराजाची अवधिज्ञानरुपी दृष्टि अकस्मात त्या वाघाकडे गेली. त्यांनी त्याचा सर्व वृत्तांत जाणिला व राजा प्रीतिवर्धनास म्हटले, राजन् ! या पर्वतावर एक श्रावक समाधिमरण घेत आहे. तू त्याची सेवा करावी. तो भविष्य काळात भरत क्षेत्रात होणाऱ्या प्रथम तीर्थंकर श्री ऋषभदेवांचा चक्रवर्ती पुत्र भरत होईल आणि त्याच भवात तो मोक्षास जाईल .

मुनिराजांचे बोलणे ऐकून राजा प्रीतिवर्धनाला अतिशय आश्चर्य वाटले. त्याने चोहोबाजूस दृष्टि फिरविली ; पण समाधि मरण घेत असलेला श्रावक त्यास दिसला नाही. तेव्हा मुनिराज राजाला धेऊन वाघाजवळ गेले व हाच श्रावक असे त्यांनी सांगितले राजाला वाघ पाहून आश्चर्य वाटले व त्यांनी मूनिआज्ञेप्रमाणे वाघाची सेवा केली. मुनिराजांनी त्याच्या कानात णमोकार मंत्र सांगितला. अठरा दिवसपर्यंत निराहारी राहून त्या वाघाने महामंत्राचा

मनाने जप करीत समाधिपूर्वक त्याग केला आणि तो दुसऱ्या स्वर्गात दिवाकर नावाचा देव होऊन जन्मला .

ही आश्चर्यकारक गोष्ट पाहून राजा प्रीतिवर्धनाचे सेनापती मंत्री आणि पुरोहित यांच्यावर त्याचा अतिशय चांगला परिणाम झाला. सर्वांनी राजाच्या अहारदानाची प्रशंसा केली. त्यामुळे मूत्यूनंतर ते उत्तम भोगभूमीत उत्पन्न झाले आणि ते दुसऱ्या स्वर्गात देव झाले.

एवढे बोलून मुनिराजांनी वज्रजंघास म्हटले - राजन् ! जेव्हा तू स्वर्गात ललितांग देव होतास त्या वेळी हे सारे तुझ्याच परिवारातील देव होते. वाघाचा जीव स्वर्गातून च्यवुन आपला मतिवर नावाचा मंत्री झाला. राजा प्रीतिवर्धनाच्या सेनापतीचा जीव स्वर्गातून च्यवून तुझा अकम्पन नावाचा सेनापती बनला. मंत्र्याचा जीव स्वर्गातून च्यवून आनन्द नावाचा पुरोहित झाला. आणि पुरोहिताचा जीव स्वर्गातून च्यवून तुझा घनमित्र नावाचा श्रेष्ठी बनला.

ज्या वेळी त्या वनात राजा वज्रजंध मुनिराजांच्या मुखाने तो सारा वृत्तान्त एकत्र होता. त्याच वेळी एक मुंगूस, एक वाघ, एक वानर आणि एक डुक्कर हे चार जीव मुनीकडे पहात बसले होते. त्यांना पाहून राजा वज्रजंघाने पुरश्च मुनिराजास म्हटले - महाराज ! हे चारी जीव मानवसमूहांनी भरलेल्या या स्थानी देखील निर्भय चित्ताने बसले आहेत. आपल्या मुखाकडे त्यांनी का दृष्टी लाविली आहे ! मुनिराजांनी म्हटले --

राजन् ! पूर्वजन्मी हा वाघ हस्तिनापूर नावाच्या नगरात उग्रसेन नावाचा वैश्यपुत्र होता. उग्रसेन स्वभावाने अत्यंत रागीट होता. एके दिवशी राजाच्या कोठीवाल्यांना दम देऊन त्याने पुष्कळसे तूप आणि तांदुळ नेवून वेश्येला दिले. राजाला ही बातमी समजताच त्याने त्यास खूप मार देवविला. त्यामुळे तो मरुन या ठिकाणी वाघ होऊन जन्मला.

हा डुक्कर पूर्वजन्मीचा राजपुत्र, परंतु फार उद्धट अन् अविनयी होता. आपल्या आई-वडिलांचे सांगणे तो कधीहि ऐकत नसे. एके दिवशी हा धावत जात असता दगडी खांबाला धडकला. त्याचे मस्तक फुटले. त्या वेळी मरण पासून त्याने डुक्कराचा जन्म धारण केला.

त्याच प्रमाणे हे माकड, पूर्वजन्मात नागदत्त नावाच्या वाण्याचा मुलगा होता. नागदत्त मोठा धूर्त आणि बनलेला ठक होता. एकदा त्याची आई आपल्या मुलीच्या लग्नासाठी आपल्याच दुकानातून काही सामान घेत होती. नागदत्ताने तिला देखील फसविण्याचे ठरविले. परंतु फसविण्याचा कोणताच उपाय न सूचल्याने त्या विचारात तो एकाएकी मरण पावला व दुर्विचारा मुळे हा माकड झाला आहे.

हे मुंगूस पूर्वजन्मी याच नगरात लोलुप नावाचा अतिशय लोभी हलवाई होते. एकदा राजा तेथे जिनमंदिर बांधवीत असता तिथं पुष्कळ मजूर विटा आणण्याचे काम करीत असत लोभी हलवाई त्या मजुरांना मिठाईचे लालुच दाखवून त्यांनी आणलेल्या विटा आपल्या धरी टाकून घेत असे. त्यातील काही विटा फुटल्या, अन् आतून सोने निघाले. ते पाहून हलवायाचा लोभ अधिकच वाढला. त्याने गुप्त रीतीने मजुरांकडून खूपशा विटा आपल्या धरी आणविल्या. एके दिवशी त्याला दुसऱ्या गावी जायचे होते. त्याने आपल्या मुलास मजुरांना मिठाई देऊन विटा आपल्या घरी टाकवून घेण्यास सांगितल. परंतु मुलाने तसे केले नाही. परत आपल्यावर हलवायास ते सारे समजले. त्याला अतिशय क्रोध आला, व त्या आवेशात मलाच्या मस्तकावर त्याने दगडाचा प्रहार केला. आपले पाय चालत गले नसते तर एवढया विटांचा तोटा आपणास सहन करावा लागला नसता. असा विचार करुन त्याने आपले पाय तोडून घेतले. घेतले शेवटी राजाने त्यास त्या दुष्कृत्याबद्दल पकडले व मार दिला. त्याने मृत्यू येवून तो हा नकुल झाला आहे.

एवढे बोलून मुनिराजांनी वज्रजंघास म्हटले - राजन ! आपण दिलेले आहरदान पाहून या चौघांना खूप आनंद झाला आहे. आपल्या पूर्वजन्माचे स्मरण झाल्याने यांना अत्यंत पश्चात्ताप झाला आहे. यानंतर पुढील आठवया भवात ज्यावेळी तुम्ही ऋषभदेव होऊन मोक्षाची प्राप्ती करुन ध्याल त्याच वेळ‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌‌ी या साऱ्यांना मोक्षप्राप्ती होईल. तुमची राणी श्रीमतीचा जीव देखील त्यावेळी श्रेयांस राजा होऊन त्याच भवात मोक्षाला जाईल .

हा सारा वृत्तान्त ऐकून राजा वज्रजंघ अत्यंत प्रसन्न झाला. त्याने मुनिराजांना अत्यंत भक्तिपूर्वक नमस्कार केला व दोधेही मुनी आकाशमार्गे विहार करित चालले.

राजा वज्रजंधाने आपल्या सैन्यासह त्या सरोवराकाठी तो दिवस घालविला. नंतर क्रमाने प्रवास करीत ते पुण्डरीकिणी नगरीस जाऊन पोहोचले. संकटानी व दुःखानी भारावून गेलेली राणी लक्ष्मीमती आपल्या जावयास व मुलीस पाहून काहीशी स्वस्थ झाली. वज्रजंधाने तेथे काही दिवस राहून बालराजा पुण्डरीकाचे राज्य निष्कंटक बनविले व तो आपल्या नगरीस परतला.

एके दिवशी राजा वज्रजंध राणी श्रीमती बरोबर आपल्या शयनगृहात शय्येवर झ ोपला असता मध्यरात्री सुगन्धित धूपाचा धूर कोंडला गेला . सेवक त्या दिवशी खिडक्यांची दारे उधडण्यास विसरले. त्यामुळे त्या दोघांचा श्वास रोखला गेला आणि दोधेही महानिद्रेत (

मरण पावले ) लीन झाले. जो धूप त्यांना सुखकर वाटे त्यानेच त्यांचा मृत्यू घडवून आणला. संसाराच्या शोचनीय स्थितीचे हे एव जळवळीत उदाहरण होय .

भोगभूमीत जन्म

वज्रजंध आणि श्रीमती यांचा एकाच वेळी प्राणत्याग झाल्याने उत्तम पात्रदानाच्या प्रभावाने ते उत्तम भोगभूमीत जन्मले एके दिवशी त्यांनी दोन चारण मुनी येत असलेले पाहील. मुनि आकाशातून ख्ाली उतरले. त्यांना पाहून वज्रजंघाच्या जीवाने आपल्या स्त्रीबरोबर उठून उभे राहून नम्रतेने नमस्कार केला. मुनींनी त्यांना आशीर्वाद देताच ते योग्य स्थानी बसले. तेव्हा वज्रजंघाच्या जीवाने म्हटले - भगवान् ! आपण कोठून येत आहात व आपले स्थान कोणते ? आपल्या दर्शनाने माझे अंत:करण अतिशय प्रसन्न बनले आहे. मला असे वाटू लागले आहे की, आपण माझे चिररिचित बंधू असावेत.

ज्येष्ठमुनींनी म्हटले - आर्य ! जेव्हा आपण महाबल राजे होता, त्यावेळी मी ( माझा जीव ) आपला स्वयंबुद्ध नावाचा मंत्री होतो. तेथून मृत्यूनंतर मी प्रथम स्वर्गात देव झ ाालो. तदनंतर स्वर्गातून च्यवून मला हा मानवाचा जन्म लाभला आहे. हा माहतपस्वी माझा धाकटा भाऊ आहे. आम्ही दोघा बंधूंनी दीक्षा घेऊन तप:सामर्थ्याने अवधिज्ञान आणि आकाशगमिनी ऋद्धि प्राप्त करुन घेतली. आपण येथे आहात हे आम्ही अवधिज्ञानानो जाणले. आपण केवळ आहारदानाच्या फलानेच या भोगभमीत उत्पन्न झालात. महाबलाच्या भवात देखील आमच्याकडून आपणास तत्वज्ञानाची प्राप्ती झाली होती. परंतु भोगांच्या अत्यधिक इच्छेने आपणास सम्यगदर्शनाची प्राप्ती त्यावेळी होऊ शकली नव्हती. या वेळेस आम्ही दोधे मोक्षास कारण असलेल्या सम्यग्दर्शनाची आपणांस प्राप्ती करुन द्यावी म्हणूनच येथे आलो आहोत. सम्यक्त्व ग्रहण करण्याची हीच वेळ आहे. कारण काललब्धीशिवाय जीवांना सम्यक्त्वाची प्राप्ती होत नाही. वीतराग सर्वज्ञ देव, त्यांच्याद्वारा सांगितला गेलेंला आगम आणि त्या आगमात सांगितल्या गेलेल्या जीवादी तत्तवांवर निष्ठा ( श्रद्धा ) यासच सम्यग्दर्शन म्हणतात. हे सम्यगदर्शन म्हणतात. हे सम्यग्दर्शन , सम्यग्ज्ञान आणि सम्यक्चारित्राचे मूल कारण आहे. सम्यग्दर्शन झाल्याशिवाय ज्ञान आणि चारित्र हो सम्यक होऊ शकत नाहीत. पदार्थाच्या यथार्थ स्वरुपाचे दर्शन करविणारे सम्यग्दर्शन धर्माचे सर्वस्व आहे. तीच मोक्षरुपी महालाची पहिली पायरी आणि धर्मरुपी वृक्षाचे मूळ आहे. जो पुरुष उन्तमुहूर्तापर्यतहि सम्यग्दर्शनाची प्राप्ती करुन घेतो . तो संसाररुपी वृक्षाची पाळेमुळे तोडून टाकतो् सासाठी हे आर्य ! अर्हन्त देवांच्या आज्ञेस प्रमाण मानून तू सम्यगदर्शनाचा स्वीकार कर.

मुनिराजांच्या धर्मोपदेशाने प्रभावित होऊन दोधाही स्त्रीपुरुषांनी आनंदाने सम्यक्त्व ग्रहण केले. त्यायनंतर ते दोन मुनी तेथून जाण्यासाठी उठले. वज्रजंध आणि श्रीमतीच्या जीवांनी त्यांना नमस्कार केला. निघते वेळेस दोन्ही मुनींनी त्यांना आशीर्वाद दिला व म्हटले - आर्य ! या सम्यग्दर्शनरुपी सत्य धर्माला कधी विसरु नका. असे म्हणून ते दोधे आकाशगामी मुनी तेथुन निघून गेलें .

मुनी अदृश्य झाल्यानंतर ते दोघे, मुनीश्वरांनी दिलेल्या उपदेशाचा मनांत विचार करु लागले. त्यांना मुनीश्वरांची नि:स्वार्थ वृत्ती व परोपकारपरायणता याबद्दल धन्यता वाटली इतक्या दूर येऊन केवळ आमच्या हिताकरताच त्यांनी उपदेश देण्याचे श्रम धेतले. यावरुन परोपकार हेच साधूचे लक्षण वर्णिले आहे. ते सार्थ आहे. अशी त्यांची खात्री झाली.

श्रीधरदेव -

भोगभूमीतील आयुष्य संपल्यानंतर वज्रजंघाचा जीव ऐशान स्वर्गात श्रीधर नावाचा देव झाला. आणि श्रीमतीचा जीव सम्यगदर्शनाच्या प्रभावाने स्त्रीलिंगाचा छेद करुन त्याच स्वर्गात स्वयंप्रभ नावाचा देव झाला. वाध्, मुंगूस, वानर आणि डुक्कर यांचे जीव देखील त्याच स्वर्गात देव झाले.

भोगभूमीत येऊन ज्यांनी आपणास सम्यक्त्व ्ग्रहण करावयास लावले होते. तया प्रीतीकर मुनिराजांना केवलज्ञान झाल्याचे श्रीधर देवास समजले. आपल्या गुरुंची पूजा करण्यासाठी उत्तम सामग्री घेऊन श्रीधरदेव त्यांच्याजवळ पोहोचला आणि नमस्कार करुन त्याने विचारले - प्रभो ! महाबलाच्या भवात माझे जे तीन मंत्री होते, ते आता कोठे आहेत ?केवलीनी म्हटले, त्या तिधांतील दोधे निगोदात आहेत आणि तिसरा शतमती मंत्री नरकात आहे.

हे ऐकून श्रीधवदेव नरकात शतमतीच्या जीवाला समजावण्यासाठी गेला. श्रीघराच्या उपदेशाने शतमतीच्या जीवने सम्यक्त्व ग्रहण केले आणि नरकातील आयुष्य संपताच तो राजपुत्र होऊन जन्मला. त्याच्या विवाहसमयी श्रीधरदेवाने त्या स्थानी येऊन त्यास पुरश्च उपदेश केला. तेव्हा त्यास वैराग्य झाले. त्याने जिनदीक्षा धारण केली. मृत्यूनंतर तो स्वर्गात देव झाला. त्याने आपल्या उपकारी मित्राची-श्रीधरदेवांची - कृतज्ञता प्रदर्शित केली.

सुविधी --

श्रीधरदेव स्वर्गातून च्यवून , महावत्स देशातील सुसीमा नामक नगरीत सुदृष्ट राजाच्या नन्दा नामक राणीच्या पोटी सुविधी नावाचा पुत्र होऊन जन्मला. तारुण्यावस्थेत त्याने आपल्या चक्रवर्ती अभयघोष नावाच्या मामाच्या मनोरमा नावाच्या मुलीशी

विवाह केला आणि स्वयंप्रभ नावाचा देव, जो पूर्वभवात वज्रजंध राजाची राणी होती, तो स्वर्गातून च्यवून त्या दोघांना केशव नावाचा पुत्र झाला. संसारातील विचित्रता कशी असते पहा ! जी पहिल्या भवात आवडती पत्नी होती. तिचाच जीव या भवात पुत्ररुपाने पोटी आला. त्या पुत्रावर सुविधि राजाचे अतिशय प्रेम होते. पुत्रावर प्रथमच सर्वाची प्रीती अधिक असते व त्यात तो पुत्र जर आपला पूर्वजनमीचा प्रिय असेल तर काय विचारावे ?

वाघ, नकुल, वानर आणि डुक्कर यांचे जीव देखील स्वर्गातून च्यवून त्याच वत्सकावती देशात राजपुत्र होऊन जन्मले व राजश्रीचा उपभोग घेत न्यायाने प्रजेचे पालन करु लागले . एकदा ते चौघे राजे चक्रवर्ती अभधोषाबरोबर जिनेंद्र देव वंदना करण्यासाठी गेले होते. तेथे सर्वाना वैराग्य प्राप्त झाले. त्यांनी जिनदीक्षा धारण केली व ते अतिशय कठीण असे तपश्चरण करु लागले. परंतु राजा सुविधि हा केशव नावाच्या पुत्रावरील अतिस्नेहाने जिनदीक्षा न घेता घरी राहूनच उद्दिष्टाहारत्याग प्रतिमा धारण करुन कठीण तप करु लागला. मरणकाल येताच त्याने सर्व परिग्रहांचा त्याग करुन समधिमरणपूर्वक शरीराचा त्याग केला आणि अच्युत नावाच्या सोळाव्या स्वर्गात तो इन्द्र झाला. सुविधीच्या मुलाने देखील निर्ग्रथ दीक्षा धारण करुन तप केले व मूत्यूनंतर तो देखील त्याच स्वर्गात प्रतीन्द्र झाला. तसेच वानर वगैरेचे जीव, जे राजपुत्र होते, तेही मरुन 16 व्या स्वर्गात देव झाले.

अच्युतेन्द्र ---

तो अच्युतेन्द्र आपल्या स्वर्गातील दिव्य भोगांचा भोग घेत आणि जिनेन्द्रदेवांची पूजा करीत आपला काल व्यतीत करीत होता. त्याचे आयुष्य केवळ सहा महिने शिल्लक राहिले. तेव्हा त्याच्या गळ्यातील पुष्पमाला कोमेजली. त्यावरुन आपणास आता येथून जावयाचे आहे हे त्याने जाणिले. परंतु त्यामुळे त्याला थोडेदेखील दु:ख झाले नाही. त्याने आपला सारा वेळ एकाग्रचित्ताने जिनेन्द्रभगवंताची पूजा करण्यात व पंचपरमेष्ठीचे चिंतन करण्यात घालविण्यास सुरुवात केली. जे स्वर्गसुखासाठी हपापलेले असतात त्यांना स्वार्गातून च्युत होण्याची वेळ येताच कल्पनातीत दु:ख होते. पण जे स्वर्गसुखाला देखील हेय-टाकाऊ समजतात. ते अशा वेळी आपले धैर्य सोडून दु:खी होत नाहीत.

सम्राट वज्रनाभि ---

सोळाव्या स्वर्गातून मरण पाऊन अच्युतेन्द्र, पुष्कलावती देशातील पुण्डरीकिणी नगरीत राजा वज्रसेन आणि राणी श्रीकांत यांच्या पोटी वज्रनाभि नामक पुत्र

झाला. तसेच पूर्वी सांगितल्या प्रमाणे व्याघ्र वगैरेचे जीवदेखील त्याच राजाराणीचे विजय, वैजयन्त, जयन्त आणि अपराजित नावाचे पुत्र झाले. वज्रजंधाच्या भवात जे त्याचे मतिवर मंत्री, आनंद पुरोहित, अकंम्पन सेनापति आणि धनमित्र सेठ होते तेही मृत्यूनंतर वज्रनाभिचे बंधू होऊन जन्मले श्रीमतीचा केशव झालेला जीव जो अच्युत स्वर्गात प्रतींद्र बनला होता, तो तेथून च्यवून त्याच नगरीत कुबेरदत्त श्रेष्ठीच्या अनंतमती नावाच्या पत्नीच्या पोटी धनदेव नावाचा पुत्र होऊन जन्मला.

तारुण्यात आल्यानंतर वज्रनाभीचे शरीर तप्त सुवर्णाप्रमाणे चमकू लागले. परंतु त्याने धर्मग्रंथाचे अध्ययन केलेले असलयाने यौवनात पदार्पण केल्यानंतरही त्यास कामबाधा झ ाली. नाही तो राजा सर्व विद्यांत निपुण होता. लक्ष्मी आणि सरस्वती या दोन्ही त्याच्यावर अनुरुक्त होत्या. त्याचे मनोहर रुप फुलणारी यौवनावस्था आणि विद्येतील प्रावीण्य पाहून सारे त्याच्याकडे आकृष्ट होत होते.

त्याच्या वडिलानी वज्रनाभि राज्यकारभार करण्यास समर्थ झाला आहे असे जाणून आपल्या नजरेसमोर मोठया ऐश्वर्यपूर्वक त्याला राज्याभिषेक करविला आणि त्यास शुभाशीर्वाद देऊन आपण जिनदिक्षा धारण केली, तिकडे वज्रसेनानें जिनदीक्षा घेऊन तीर्थंकर पदाची प्राप्ती करुन घेतली आणि इकडे त्याच्या वज्रनाभि नावाच्या पुत्राला चक्ररत्न प्राप्त झ ाल्याने चक्रवर्ती पदाची प्राप्ती झाली. वडिलांनी कर्मसेनेवर विजय मिळविला आणि पुत्राने शत्रूवर विजय मिळविला.

एके दिवशी चक्रवर्ती वज्रनाभि आपला पिता वज्रसेन तीर्थंकराच्या समवसरणात गेला. त्याच्या मुखाने रत्नत्रयाचे स्वरुप जाणून घेऊन त्याने आपले सम्पूर्ण साम्राज्य तृणवत जाणून ते सोडून देण्याचा विचार केला. आणि आपल्या मुलाला राज्य देऊन तीर्थंकराजवळ जिनदीक्षा धेतली.

दीक्षा घेतल्यानंतर उत्कृष्ट तपस्वी बनून एकाकी ते विहार करु लागले. आपले पिता तीर्थंकर वज्रसेन यांना शरण जाऊन त्यांनी त्यांच्याजवळ सोळा कारण भावनांचे चिन्तन, मनन आणि तद्नुसार पालन केले. त्यामुळे त्सास तीर्थंकर नामकर्माचा बंध पडला. मुनिराज वज्रनाभीने दोषरहित शूद्ध सम्यग्दर्शन धारण केले. विनयुणांचा अंगीकार केला. शील व व्रतामध्ये प्रमाद घडू दिला नाही. ते निरंतर ज्ञानसाधनेत लीन असत. संसाराबद्दल त्यांना हर्षविषाद नव्हता. आपल्या शक्त्यनुसार नेहमी तपश्चरण करण्यात ते मग्न असत. कोणा मुनीश्वरांना रोग झाल्यास त्यांचे वैयावृत्त प्रेमानें करण्यास ते तयार असत. अरिहन्त भगवान,

आचार्य तसेच ज्ञानी मुनीचे ते एकनिष्ठा भक्त होते. खऱ्याशास्त्राचे ते पुरस्कर्ते होत. सामायिक वन्दना, स्तुति, प्रतिक्रमण प्रतयाख्यान आणि कायोत्सर्ग या सहा आवश्यक कर्तव्यात ते नेहमी तत्पर असत. अशा प्रकारे मोक्षमार्गाची प्रभावना करीत व धार्मिक जनांबरोबर अत्यंत श्रद्धेने वागून ते आपला जीवनकाल व्यतीत करीत होते.

या सोळा भावनांच्या चिंतनाने त्यांना तीर्थकर नावाच्या महापुण्यकर्माचा बंध पडला. मृत्यूसमय प्राप्त होताच त्यांनी सन्यास धारण् करुन शरीर आणि आहार यावरील ममत्वाचा त्याग केला. ते स्वत:आपल्या शरीराची सेवा करीत नसत. व दुस.याकडून सेवा करुन घेत नसत. यामुळे जरी त्यांच्या शरीरात केवळ हाडे आणि कातडेच शिल्लक होते, तरी देखील ते निश्चल चित्ताने ध्यानारुढ झाले. शेवटी त्यांचे अकराव्या गुणस्थनात असताना प्राणविसर्जन झाल्यामुळे ते सर्वार्थसिद्धी नावाच्या विमानात जन्मले.

अहमिन्द्र --

सर्वार्थसिद्धि नावाचे विमान लोकाकाशाच्या अन्तिम टोकापासून योजन खाली आहे. तेथे जन्म घेणाऱ्या जीवांचे सारे मनोरथ विनायास सफल होतात. यासाठी त्यास सर्वार्थसिद्धि म्हटले जाते. सर्वार्थसिद्धि विमानात दुसऱ्यावर अधिकार गाजविणारा कोणीहि एखादाच श्रष्ठ इंद्र नाही. तेथे प्रत्येक देव इंद्र असतो. यास्तव त्यांना अहमिन्द्र म्हटले जाते. तया अहमिन्द्रामध्ये परस्परात ईर्षा नसते व द्वेषही नसतो. स्वत:ची प्रशंसा करुन दुसऱ्याची निंदा करणारा महाभाग तेथे कोणी सापडावयाचा नाही. म्हणून ते सारे परस्पराशी प्रेमाने वागून धर्मचर्चेत आपला काल घालवितात. तेथे स्त्री समागम नसतो. म्हणून ते परमसुखी असतात. कारण स्त्रीसंभोग मनात मोह निर्माण करतो, शरीरात शिथिलता आणतो, तृष्णा वाढवितो, म्हणून तो सर्व आकुलतेचे कारण आहे. आणि जेथे आकुलता असते, तेथे सुख राहू शकत नाही. म्हणून अहमिन्द्र नेहमी अत्यंत सुखी असतात.
चक्रवर्ती वज्रनाभि त्या अहमिन्द्रामध्ये उत्पन्न झाला. आणि त्यांचे इतर बंधू जे पूर्व जन्मामध्ये त्याचे साथीदार होते. तेही मरुन त्याच सर्वार्थसिद्धीमध्ये अहमिन्द्र झाले. सारेजण अतिशय शान्ततेने धर्मर्चेत काल धालवू लागले.

3

## ऋषभदेवांचे गर्भावतरण

भरत क्षेत्रात भोगभूमीची अवस्था बदलून कर्मभूमीची व्यवस्था सुरु होण्याचा समय होता. चौदावे मनु नाभिराज त्या समयी प्रमुख पुरुष होते. भरतक्षेत्रातील आर्यखंडाच्या

मध्यभागी त्यांचे निवासस्थान होते. त्यांच्या पत्नीचे नांव मरुदेवी होते. रुप सौंदर्य , कान्ति, बुद्धि वगैरे गुणांनी ती इन्द्राणीप्रमाणे शोभत असे. नाभिराजांना ती अत्यंत प्रिय होत.

भोगभूमीकालात तेथे गाव, नगर, शहर वगैरेची रचना केली गेली नव्हती. कर्मभूमी काल आला तेव्हा नगररचनेस आरंभ झाला. सर्वात प्रथम अयोध्या शहराची रचना केली गेली शहराच्या मध्यभागी राजवाडा होता. महाराज नाभि आपल्या पत्नीबरोबर तया महालात राहू लागले. आणि इतस्तत: पसरलेले मानव त्या शहरात क्रमश: येऊन राहू लागले.

एके दिवशी अचानक स्वर्गातून त्या नगरीवर सोन्याचा पाऊस पडू लागला. हे पाहून साऱ्या जनतेला आश्चर्य वाटले. ते विचार करु लागले की, पृथ्वीप्रमाणे स्वर्गात देखील क्रांती होत आहे की काय ? येथे दररोज सोन्याचा पाऊस पडू लागला. अशा प्रकारे क्रमाने सतत सहा महिने पाऊस तर एके दिवशी राजभवनातील कोमल शय्येवर राणी मरुदेवी झोपली असता तिने उत्तररात्रीच्या शेवटच्या प्रहरात सोळा स्वप्ने पाहिली. पहिल्या स्वप्नात तिने ऐरावत नावचा हत्ती पाहिला. त्याच्या गण्डस्थळातून मद झरत होता, व तो जारजोराने गर्जना करीत होता दुसऱ्या स्वप्नात तिने शुभ्र बैल पाहिला. चौथ्या स्वप्नात कमलासनावर विराजमान झ ालेल्या लक्ष्मीस तिने पाहिले. दोन हत्ती त्या लक्ष्मीला अभिषेक करीत होते पाचव्या स्वप्नी तिने दोन पुष्पमाला पाहिल्या तयावर भुंगे गुंजारव करीत उडत होते. सहाव्यात तिने पौणिमेच्या चंद्रमासहित चमकणाऱ्या तारा पाहिल्या फुललेल्या कमलांनी ज्यांचे मुख झाकलेले आहे असे दोन सुवर्ण सातव्यात उगवता बालसूर्य पाहिला. आठव्या स्वप्नी तिने सुंदर कलश पाहिले. नवव्या स्वप्नांत दोन मासे सरोवरात क्रीडा करीत असलेले तिला दिसले. दहाव्यात तिने एक सुंदर तलाव पाहिला. अकराव्यात स्वप्नी विशाल सागरावर उसळणाऱ्या लाटा पाहिल्या बाराव्यात तिला एक सोन्याचे सिंहासन दिसले. तेराव्या स्वप्नी तिने एक स्वर्गीय विमान पाहिले. चौदाव्यात पृथ्वी भेदून त्यातून वर आलेले एक विमान दिसले. पंधराव्या स्वप्नांत रत्नांच्या राशी आणि सोळाव्या स्वप्नांत धुराशिवाय फुललेला आग्नि पाहिला. या सोळा स्वप्नांनंतर मरुदेवीने सुवर्ण रंगाचा एक उंच मदोन्मत्त बैल आपल्या मुखात प्रवेश करीत असताना पाहिला.

पहाटेच्या मंगल वाद्यांच्या मंजुळ आवाजाने ती जागी झाली, व शुभ स्वप्नांची आठवण होऊन तिचे सर्वाग आनंदाने पुलकित झाले. तिने स्नान केले. सुंदर वस्त्राभूषांनी अलकृत होऊन ती पतीजवळ गेली, व म्हणाली- पतिदेव ! आज मी सुखाने झोपले असता रात्रीच्या शेवटच्या प्रहरी सोळा स्वप्ने पाहिली त्या स्वप्नांचे फल काय मिळेल ते सांगा.

महाराज नाभिराज म्हणाले - देवी ऐक, तुला सर्वगुण - संपन्न पुत्र होईल. तो सर्व लोकांत श्रेष्ठ, अनंतशक्तीचा धारक, धर्मप्रवर्तक होईल. सुमेरुपर्वतावर नेऊन देव त्याला अभिषेक करतील सर्व लोकांना आनंद होईल. तो मोठा प्रतापी बनून अनेक प्रकारच्या ऐश्वर्याचा भोंक्ता बनेल. अनेक अक्षणांनी साम्राज्यपति बनून तो शोभून दिसेल. तो स्वर्गातून येईल. त्याला जन्मतः मति, श्रति व अवधी अशी तीन ज्ञाने असून शेवटी अग्निशिखे प्रमाणे कर्मरुपी इंधनांना जाळून तो केवलज्ञानी बनेल.

नाभिराजाचे ते भाषण ऐकून राणी मरुदेवीचे शरीर हर्षाने फुलून गेले. आनंदाने पतीस नमस्कार करुन ती अंतपुराकडे गेली. त्या वेळी अवसर्पिणीच्या तिसऱ्या सुषमादु:षया नावाच्या काळातील चौऱ्यांशी लाख पूर्व, तीन वर्षे आणि साडे आठ महिन्याचा कालावधी शिल्लक राहिला होता. आषाढ कृष्ण द्वितीया होती. उत्तराषाढा नक्षत्र होते. तेव्हा तो अहमिन्द्र वज्रनाभी सर्वार्थसिद्धी विमानातून च्यवून मरुदेवीच्या गर्भात अवतरला. त्यावेळी प्रकट होणाऱ्या चिन्हांवरुन भगवानांच्या गर्भावतरणाची ही वेळ आहे असे जाणून सारे इंद्र नाभिराजांच्या महालात जमले. राजमहालाचे अंगण देवांनी भरुन गेले. प्रथम सौधर्म स्वर्गातील इंद्राने आपल्या देवांबरोबर निरनिराळी वाद्ये वाजवीत भगवंताचे गुणगान केले. याप्रमाणे गायन, नर्तन आणि वादनाच्या आवाजात सारी नगरी आनंदाने वेडी होऊन नाचू लागली त्यापूवीच नाभिराजांच्या अंगणात सहा महिने आधि सुवर्णवृष्टा होत होती.

4

## जन्म आणि बालपण

इंद्राच्या आज्ञेने श्री, हि, घृती, किर्ती, बुद्धी आणि लक्ष्मी नावाच्या सहा देवीनी गर्भवती मरुदेवीची सेवा करण्याचे कार्य स्वीकारले. तया देवीनी पाहून असे वाटे की, प्रत्यक्ष मरुदेवीच्या शोभा, लज्जा, धैर्य, बुद्धी आणि लक्ष्मी नावाच्या गुणांनीच देवीची रुपे धारण केली असून त्यांनी सेवाव्रताचा अंगीकार केला आहे.

त्यातील काही देवी गर्भवती मरुदेवीला मंगलस्नान घालीत असत, काही वस्त्रभूषणांनी सुशोभित करीत, काही सुगन्धित फुलांच्या माळा तयार करुन समवीत, कोणी उत्तम प्रकारे भोजन आणून हजर ठेवीत, कोणी तिला पानविडा देई कोणी मऊ मऊ शय्या तयार करी, तर कोणी तिचे पाय चेपून, तिची सेवा करीत. त्या देवी कधी जलक्रीडा करुन कधी वनविहार करुन कधी सुंदर आकर्षक कथा सांगून, कधी उत्तम प्रकारच्या गायनवादनांनी तर कधी नृत्य करुन मातेचे मनोरंजन करीत. अंतकरणपूर्वक व आनंदाने त्या देवी

मरुदेवीमातेची सेवा करीत होत्या. त्याच्या हास्यविनोदात मातेला नऊ महिने नऊ क्षणाप्रमाणे व्यतीत झाल्यासारखे वाटलें. नाभिराज उत्सूकतेने अधीर होऊन पुत्रजन्माची वाट पहात होते. त्यांनी देखील नऊ महिने धैर्याने घालविले.

संतोषवृत्ति ठेवल्याने तिची फळे देखील गोडच मिळतात अशी म्हण आहे. महाराज नाभीनी देखील धारण केलेल्या संतोषरुपी वृक्षाला अतिशय गोड फळे आली. प्रभातसमयी कमलिनींना विकसित करणाऱ्या तेजस्वी सूर्यास जशी पूर्वदिशा जन्म देते, तेद्वत् नवमीच्या दिवशी सूर्योदयाच्या वेळी उत्तराषाढा नक्षत्र असताना मरुदेवीने एका तेजस्वी प्रत्राला जन्म दिला.

पुत्राचा जन्म होताच आकाश निरभ्र झाले. दिशा उजळल्या. प्रजा आनंदसागरी बुडाली. देवलोकात आश्चर्यकारक घटना घडू लागल्या, कल्पवृक्ष फुलांचा वर्षाव करु लागले. स्वर्गात दुदंभीचा आपोआप आवाज येऊ लागला. शीतल, मंद, मधुर वायू वाहू लागला. पृथ्वी रोमांचित झाली सागर लाटांशी खेळू लागला, आणि इंद्रासन कंम्प पावले.

आसन कंम्पायमान होताच इंद्र क्षणभर भयभीत होऊन उठला. त्याने भरत-क्षेत्रात तीर्थकरांचा जन्म झाल्याने अवधिज्ञानाने जाणले व त्यामुळे तो शांत झाला. आनंदाने सिंहासनावरुन उठून त्याने बालजिनेंद्राना परोक्ष नमस्कार केला व त्यांचा जन्माभिषेक करण्याचा निश्चय केला.

इंद्राची आज्ञा मिळताच सारा देवमूह स्वर्गातून निघाला. सौधर्म इंद्र आपल्या इंद्राणीबरोबर ऐरावत हत्तीवर आरुढ होऊन सर्वाच्या पुढे होता. सामाजिक, त्रायस्त्रिंश, पारिषद आत्मरक्ष आणि लोकपाल जातीचे देव इंद्राच्या आजू-बाजूने चालू लागलें. त्यांच्या पाठोपाठ देवसेना जयजयकार करीत निधाली थोडयाच वेळात ते अयोध्या नगरीत येऊन पोहोचले. अयोध्या नगरीच्या भोवती देवसमूह पसरला. इंद्र नाभिराजांच्या राजवाडयातील अंगणात उतरला. इंद्राणीने प्रसूतिगृहात प्रवेश करुन बालजिनेंद्राचे व जिनमातेचे दर्शन घेतले. मातेला मोहनिद्रित करुन तिने एका मायावी बालकाला मातेजवळ ठेवले व बालजिनंद्रांना उचलून आपल्या ओटीत घेतले बालकाच्या शरीराचा स्पर्श होताच तिन्ही लोकांतील सर्वस्वाची प्राप्ती झाल्याप्रमाणे तिला वाटले ती पुन:बालकाच्या मुखाकडे पाहून त्याला ह्दयाशी कवटाळून घेत असे. त्याच्या मस्तकाचे पुन:पुन: चुंबन घेई. इंद्राणीने बालकाला आपल्या ओटीत घेऊन निघताच असे वाटू लागले की, बालसूर्याला घेऊन निघालेली ही पूर्व दिशाच आहे.

बाहेर येऊन इंद्राणीने बालजिनांना इंद्राच्या हाती दिले. इंद्राणीच्या हातून बालकाला घेऊन त्याने पाहिले. त्याच्या सौंदर्याकडे पाहून त्याचे मन हर्षातिरेकाने भरुन गेले. बालकाला पाहता

त्याला त्रैलोक्याचा विसर पडला व तो बालजिनाशी एकरुप झाला. तेव्हा इंद्राणीने त्यास आत्मविस्मृतीतून सावध केले आणि हात उचलून पुढे चालण्याचा संकेत केला.

इंद्राने संकेत करताच देवगण जयजयकार करीत वर चालले. सौधर्म इंद्र बालकाला घेऊन हत्तीवर आरुढ झाला ईशान स्वर्गातील इंद्राने बालकावर छत्र धरले आणि सनत्कुमार, तसेच माहेंद्र स्वर्गातील इंद्र बालकाच्या दोन्ही बाजूंनी चामर ढाळू लागले.

क्रमाने ज्योतिषपअलाचा विभाग ओलांडून ते सुमेर पर्वतावर येऊन पोहोचले. सर्वानी मोठया भक्तीने पर्वतराजास प्रदक्षिणा घातली व पाण्डूक शिलेवर बालकास विराजित केले बालजिनांचा जन्माभिषेक पाहण्यासाठी सारे देव अतिशय उत्कंठित झाले होते. ते पाण्डूक शिलेच्या भोवती येऊन बसले ज्यांना तेथे स्नान मिळाले नाही, ते मेरुपर्वताच्या वर आकाशात उभे राहिले.

अभिषेकाची तयारी सुरु होताच देवांनी दुन्दुभी वाजविण्यास आरंभ केला. अप्सरा नाचू लागल्या. पुष्कळसे देव सुवर्णकलश हाती धेऊन क्षीरसमुद्राकडे पाणी आणण्यास निघाले क्षीरसमुद्रापासून पाण्डूक शिलेपर्यत देवांची ओळ लागली. क्षणातच एका देवाच्या हातून दुसऱ्या देवाच्या हाती जाणाऱ्या कलशांनी सारे आकाश भरुन गेले. सौधर्मेद्राने जयजयकार करीत भगघंताच्या मस्तकावर पाण्याची धार सोडताच एकदम कोटयावधि देवांच्या कंठातून स्फुरलेल्या जयजयकारांनी आकाशमंडळ गर्जू लागले. तदनंतर सव्र स्वर्गातील इंद्रानी भगवंताच्या मस्तकावर एकदा पाण्याच्या सहस्त्र धारा सोडल्या. त्यावेळी भगवंताच्या शरीरावर पडून उठणारे जलबिंदू जणू काय आनंदाने नाचत आहेत असे वाटे .

शुद्ध जलाचा अभिषेक संपताच इंद्राने सुगन्धित पाण्याने भगवंताला अभिषेक केला. तो संपताच इंद्राने जगात शांति नांदावी यासाठी उच्च स्वराने प्रार्थना केली. तद्नंतर देवांनी गन्धोदक आपल्या मस्तकावर आणि साऱ्या शरीराला लावले. तद्नंतर भगवंतांची पूजा केली गेली.

इंद्राणीने बालकाचे शरीर वस्त्राने पुसून घतले. त्यास सुगन्घित द्रव्यांचा लेप दिला. नंतर वस्त्राभूषणांनी अलंकृत करुन इंद्राजवळ दिले. त्यावेळी बालकाचे सौंदर्य पाहून आदरपूर्वक भक्तिभावाने इंद्राने त्यांची स्तुती केली. नंतर अयोध्येस परतण्याचा विचार केला. आणि जया ऐश्वर्यासहित उत्सवपूर्वक ते मेरुपर्वताकडे आले होते, त्याच ऐश्वर्याने ते परत अयोध्येस येऊन पोहोचले.

अयोध्येस पोहोचताच इंद्राने भगवंताना घेऊन महाराज नाभीच्या राजभवनात प्रवेश केला. त्यावेळी नाभिराज आणि मरुदेवी आपल्या प्रियदर्शी पुत्राला पाहून अत्यंत आनंदित झाले. आणि इंद्र-इंद्राणीकडे ते आश्चर्यचकित नजरेने पाहू लागले. त्यांचा अभिप्राय ओळखून इंद्राने

जन्माभिषेकाचे सर्व वर्तमान त्यांना सांगितले आणि दोघांची स्तुती करुन बालकास त्याच्या हाती सोपविले.

आपल्या पुत्राच्या जन्माभिषेकाची कथा ऐकून मातापित्यांना साश्चर्य आनंद वाटला. इतक्यात नरवासी जनांचा प्रचंड समूह गीत गात, नृत्य करीत आणि वाद्ये वाजवीत येथे आला. त्यांना पाहून इंद्राच्या अंगागांतून आनंदाच्या लहरी उसळल्या पायात गति आली. हात हावभावांच्या प्ररणेने नाचू लागले. इन्द्राने नृत्य करण्यास आरभ केला. गंधर्वाने आपल्या सुमघुर संगीताने त्या स साथ दिली. ते पाहताच इतर अनेक देव-देवांगना इन्द्राबरोबर नृत्य करण्यास धावले. इंन्द्राने आपले दोन्ही हात पसरुन नृत्य करण्यास आरंभ केला. इन्द्राच्या बाहूवर देवांगना नृत्य करु लागल्या. काही देवांगना इंन्द्राच्या अंगुलीवर उभ्या राहून सूची नृत्याचा अभिनय करु लागल्या. काही देवांगना त्या अंगुलीच्या अग्रभागावर आपली नाभि ठेऊन फिरकिप्रमाणे फिरु लागल्या.

महाराज नाभिराज आणि मरुदेवी त्या आश्चर्यजनक नृत्याला चकित झाले. त्याच वेळी बालकाचे नाव ऋषभ असे ठेवण्यात आले कारण प्रथमतः सर्व जगात श्रेष्ठ म्हणून तो जन्मला होता. दुसरे कारण तो उत्तम धर्मसंस्थापक होता. तिसरे त्याच्या मातेने गर्भावतरणाच्या वेळी स्वप्नात ऋषभ ( बैल ) पाहिला होता. या कारणांनी मुलाचे नाव ऋषभदेव असे ठेविले गेले. याप्रमाणे जन्ममहोत्सव साजरा करुन इन्द्र आपल्या देवसेनेबरोबर स्वस्थानी गेला.

भगवान ऋषभदेव महाराज नाभिराजांच्या घरी बालचंद्राप्रमाणे हळुहळु वाढत चालले आणि देवकुमारांबरोबर खेळू लागले. त्यांच्या शारीरिक अवयवांच्या वाढीबरोबर ज्ञान व विद्यायात ते प्रवीण होऊ लागले. कोणीही गुरुशिवाय त्यांनी सर्व विद्या, कला आणि क्रियांमध्ये नैपुण्य मिळविले. त्या वेळी ते एकटेच सरस्वती देवतेचे नाथ असल्याने तेच सर्व जगाचे गुरु समजले जात.

यौवनावस्था प्राप्त झाल्यानंतर ते अतिशय मनोहर दिसू लागले, त्यांचे सौंदर्य पाहून मानव आनंदाने बेहोष होत. एके दिवशी महाराज नाभिराज त्यांच्या पूर्ण तारुण्यावस्थेकडे पाहून विचारात पडले. ते विचार करु लागले. कुमार अतिशय सुंदर आहे, परंतु त्याची विषयवासना अतिशय मंद आहे. हा आता विवाह करण्यायोग्य झाला आहे. यास्तव याच्या मनाला आपल्या सौंदर्याने वेड लावणारी कन्या शोघली पाहिजे. शिवाय हा तीर्थंकर आहे. एक दिवस सर्व परिग्रहांचा त्याग करुन तपस्वी बनणार, पण जोपर्यत अशी वेळ आली नाही तोवर लोकव्यवहाराची प्रवृत्ती सांभाळावी म्हणून त्याचा विवाह करणे अवश्य आहे.

असा विचार करुन नाभिराज भगवंताजवळ गेले आणि त्यांनी त्याला म्हटले आयुष्मन् कुमार, सूर्याच्या उदयाला जसे उदयाचल निमित्त मात्र असतो, तसे तुझ्या जन्मास आम्ही निमित्त मात्र आहोत. खरोखरच मी तुझा पिता नव्हे. पण लोकव्यवहाराला अनुसरुन पिता आहे. यास्तव कर्तव्यवश होऊन मी काही सांगू इच्छितो. तू आता लौकिक सृष्टीत आपले मन लावावे. कारण तू आदिपुरुष आहेस. तुझ्या पावलावर पाऊल टाकूनच सामान्य जन पुढे जाणार आहेत. याकरिता तुला पसंत असेल त्या कन्येशी विवाह करावा. त्यामुळे प्रजेच्या परंपरेचा नाश होणार नाही आणि धर्मपरंपरा अखंड टिकून राहिल. कन्येचे करगहण करणे हा गृहस्थधर्म आहे. कारण गृहस्थाने धर्मरक्षणासाठी संततीचे उत्पादन करणे अवश्य आहे. जर तू मला गुरुस्थानी मानीत असशील तर माझे वचन उल्लंघू नकोस. थोरामोठयांच्या शब्दाला मान देण्यात औचिंत्यच आहे. एवढे बोलून महाराज आणि नाभि शांत झाले. व भगवंतानी स्मितहास्य करुन त्यास मूक संमती दिली. पुत्राची अनुमती आहे. हे नाभिराजांनी ओळखले. विवाह महोत्सवाची तयारी करण्यास आरंभ करण्यास आला त्यांनी इंद्राच्या संमतीने सुशील व सुंदर लक्षणांनी युक्त अशा दोन कन्या पसंत केल्या त्या दोन्ही कच्छ आणि महाकच्छ यांच्या बहिणी होत्या. एकीचे नांव यशस्वती होते आणि दुसरीचे नांव सुनंदा होते. नाभिराजांनी त्या दोन मुलीबरोबर ऋषभदेवांचा विवाह केला. दोन सुंदर सद्‌गुणी सुनांसहित पुत्रास पाहून नाभिराज व मरुदेवी अतिशय प्रसन्न झाले. लौकिक धर्मच सर्वाना प्रिय असतो. त्यातून स्त्रियांना आपल्या पुत्रांच्या विवाहोत्सवातच अधिक आनंद असतो. या विवाहोत्सवाने जनता देखील अतिशय आनंदली. मनुष्यसमाज स्वत:च भोग भोगण्यास आतुर झालेला असतो, तेव्हा आपल्या नेत्यांना भोगी बनत चाललेले पाहून त्याचा आनंद द्विगुणित होणे स्वाभाविकच आहे. याप्रमाणे आपल्या दोन सुंदर पत्नीबरोबर भोगोपभोग घेण्यात ऋषभदेवांचा बराच काल क्षणासारखा निघून गेला.